# परळीत भाजप-राष्ट्रवादी युतीचा विजय

## आजचा निकाल परळीला बदनाम करणाऱ्यांच्या तोंडात लगावलेली चपराक : धनंजय मुंडे

■ महासागर प्रतिनिधी
बीड, दि. २१ :

नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत बीड जिल्ह्यात महायुतीने विरोधकांचा अक्षरशः धुव्वा उडवला आहे. परळीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भाजप आणि रिपाइंच्या महायुतीने ऐतिहासिक विजय मिळवला असून, अंबाजोगाई आणि गेवराईतही भाजपने आपला झेंडा फडकवला आहे. या विजयानंतर बोलताना आमदार धनंजय मुंडे आणि आमदार पंकजा मुंडे यांनी जनतेचे आभार मानत विरोधकांवर जोरदार निशाणा साधला.



परळीतील विजयावर प्रतिक्रिया देताना धनंजय मुंडे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि रिपाइंच्या महायुतीला आज कौल दिलाय. एखादी दुसरी जागा सोडली, तर जवळजवळ सर्व जागा महायुतीच्या आल्या आहेत. अपक्ष उमेदवार देखील महायुतीचेच आहेत. त्यामुळे फक्त एमआयएम आणि पंजा दोन जागांवर पुढे असल्याचे कळतंय. पण जवळजवळ सर्व जागांवर महायुतीने ऐतिहासिक मतांनी विजय मिळवला. नगराध्यक्ष सुद्धा निवडून येतील.

परळीकरांचे ऋण व्यक्त करतो, त्यांनी अभूतपूर्व विजय दिला. जवळजवळ महायुतीचे सर्वच उमेदवार निवडून आले. आता तरी विरोधकांनी आपली जागा काय, लायकी काय हे बघितले पाहिजे. प्रचारावेळी ज्यांनी माझ्यावर टीका केली, माझ्या परळीला बदनाम केले. याचे उत्तर मी त्यावेळी दोन तारखेला म्हटलो होतो. पण निकाल लांबला आणि आज 21 तारखेला परळीच्या जनतेकडून आम्हाला बदनाम करणाऱ्यांच्या तोंडात ही चपराक आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले. परळीत खासदार तळ ठोकून राहिले, तरी परळीच्या मायबाप जनतेला काही फरक पडत नाही, असा टोला धनंजय मुंडे यांनी खासदार बजरंग सोनवणे यांना लगावला.

एखाद्या गावाला, शहराला बदनाम करण्यासाठी विरोधकांनी जो डाव टाकला तो परळीकरांनी उधळून लावला. मी कधीही मंत्रीपदाच्या लालसेसाठी राजकारणात आलेलो नाही, सर्वसामान्य माणसाच्या मनात स्थान निर्माण करणे तेच माझ्यासाठी महत्वाचे आहे, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

भाजपच्या विधान परिषद आमदार पंकजा मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील निकालांवर समाधान व्यक्त केले. "बीडच्या जनतेने लोकसभा निवडणुकीतही आम्हाला मोठे प्रेम दिले होते. अगदी निसटता पराभव झाला. यंदा परळीत आम्ही राष्ट्रवादीसोबत युती केली, तर इतरत्र स्वतंत्र लढलो. गेवराई आम्ही राखली आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अंबाजोगाईत आम्ही कधीही न मिळवलेला विजय संपादन केला आहे. धारूरमध्ये आमचा निसटता पराभव झाला असला, तरी कार्यकर्त्यांनी सत्ते नसतानाही दिलेली झुंज कौतुकास्पद आहे," असे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

## नांदेडमध्ये शरद पवार गटाची सरशी

■ महासागर प्रतिनिधी,
नांदेड, दि. २१ :

नांदेड जिल्ह्यातील लोहा नगर परिषद निवडणुकीत एकाच कुटुंबातील तब्बल सहा जणांना उतरवणाऱ्या भाजपला मतदारांनी चोख प्रत्युत्तर दिले असून, या सहाही उमेदवारांचा दारूण पराभव झाला आहे. घराणेशाहीला थारा न देता मतदारांनी लोहा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला विजयी करत भाजपला मोठा धक्का दिला आहे. लोहा नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपने नगराध्यक्षपदासाठी गजानन सूर्यवंशी यांना उमेदवारी दिली होती. मात्र, केवळ नगराध्यक्षपदच नव्हे तर नगरसेवक पदाच्या इतर पाच जागांवरही त्यांच्याच कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी देण्यात आली होती. सातत्याने घराणेशाहीवरून काँग्रेसवर हल्लाबोल करणाऱ्या भाजपची ही कृती म्हणजे घराणेशाहीचा कळस असल्याची टीका विरोधकांकडून होत होती.

## तेच आकडे, त्याच मशिन, तिच सेटिंग
# संजय राऊत यांचे निकालावर भाष्य

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर आपली प्रतिक्रिया दिली आहे. हे आकडे विधानसभेसारखेच आहेत. तेच आकडे, त्याच मशिन आणि तीच सेटिंग. आकड्यांमध्ये कोणताही बदल झाला नाही. भाजपने मशिन विधानसभेसारख्याच सेट केल्या. त्यांनी यावेळी निदान आकडे तरी बदलण्याची गरज होती, असे ते आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

मुंबई महापालिकेच्या तोंडावर आज ठाकरे गट व मनसेच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर बोलताना संजय राऊत म्हणाले, आज दोन्ही पक्षांच्या नेत्यांची बैठक झाली. चर्चा पूर्णपणे पूर्ण झाली आहे. चर्चा व जागावाटप संपले आहे. कुणी कुठे लढायचे यावर एकमत झाले. कोणती अडचण दिसत नाही. ज्या अडचणी होत्या, त्या स्वतः राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांनी लक्ष घालून दूर केल्या. सर्व कार्यकर्त्यांचे समाधान होईल याची काळजी घेतली. तरीही युती काही गोष्टी या कटुतेने सोडवाव्या लागतात. कार्यकर्त्यांच्या भावना व मान राखायचा असतो. त्यात आम्ही यशस्वी झालो असे आम्हाला वाटते. आजची बैठक आमची शेवटची बैठक होती असे आम्ही मानतो. येत्या 1-2 दिवसांत यासंबंधीची रितसर घोषणा होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसला यश मिळाले आहे. आता तुम्ही त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणार का? असा प्रश्न यावेळी पत्रकारांनी संजय राऊत यांना केला. त्यावर ते म्हणाले, नक्कीच आमचे शेवटपर्यंत प्रयत्न करतील. काँग्रेस हा महाविकास आघाडीतील एक प्रमुख पक्ष आहे. काँग्रेसची स्वतःची एक व्होटबँक आहे. लोकसभा व विधानसभा एकत्र लढल्यामुळे आपण महापालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुका एकत्र लढावे अशी आमची व त्यांचीही इच्छा आहे.

## सिद्धी वस्त्रे ठरल्या
### राज्यातील सर्वात तरुण नगराध्यक्ष

■ महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. २१ :



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ नगरपरिषदेसाठी झालेल्या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का दिला आहे. शिवसेनेच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांचा १७० मतांच्या फरकाने पराभव करत नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले आहे.सिद्धी वस्त्रे यांचा विजय म्हणजे एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे, कारण त्या केवळ २२ वर्षांच्या आहेत आणि त्या राज्यातील सर्वात तरुण नगराध्यक्ष ठरल्या आहेत. निवडणुकीत त्यांची आणि त्यांच्या पक्षाची कारकीर्द एक वळण घेणारी ठरली आहे.

मोहोळमध्ये भाजपचा प्रभाव जरी मोठा असला, तरी याच गडात शिवसेनेने आपल्या वर्चस्वाची ठसा उमठवला आहे. माजी आमदार राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपने मोहोळमध्ये शक्ती निर्माण केली होती, पण या निवडणुकीच्या निकालाने त्यांच्या नेतृत्वाला मोठे आव्हान दिले आहे. सिद्धी वस्त्रे यांचा विजय भाजपच्या पंक्तींमध्ये अस्वस्थता निर्माण करत असून आगामी निवडणुकांसाठी शिवसेनेला आत्मविश्वास मिळाला आहे.

शिवसेनेच्या नगरपरिषदेच्या एकूण २० जागांपैकी ९ जागांवर विजय मिळवत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. हे निकाल शिवसेनेच्या एकजुटीला आणि पक्षाच्या कारभारातील विश्वासाला प्रगल्भतेचा एक मोठा पुरावा ठरले आहेत.विजयानंतर माध्यमांशी बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे अत्यंत भावुक झाल्या होत्या.

# योगेश कदम यांच्या नेतृत्वाखाली खेडमध्ये महायुतीची सत्ता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :

कोकण विभागातून आलेले नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचे निकाल एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसाठी अत्यंत उत्साहवर्धक ठरले आहेत. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यांमध्ये महायुतीने वर्चस्व प्रस्थापित केल्याचे स्पष्ट झाले आहे. मालवण आणि कणकवली या महत्त्वाच्या ठिकाणी शिवसेनेच्या उमेदवारांनी विजय मिळवत आपली ताकद दाखवून दिली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेनेचा प्रमुख चेहरा म्हणून नीलेश राणे यांचे नेतृत्व महत्त्वाचे मानले जाते, तर रत्नागिरी जिल्ह्यात उदय सामंत आणि योगेश कदम या मंत्र्यांची भूमिका निर्णायक ठरली आहे. या निकालांमुळे कोकणातील राजकीय चित्र स्पष्टपणे महायुतीच्या बाजूने झुकलेले दिसत आहे.



रत्नागिरी जिल्ह्यातील खेड नगरपरिषद निवडणूक हा या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वात चर्चेचा निकाल ठरला आहे. गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने येथे 21 पैकी 21 जागांवर विजय मिळवत 21-0 असा ऐतिहासिक आणि एकतर्फी कौल मिळवला. 2 डिसेंबर रोजी मतदान झाल्यानंतर खेडमध्ये सत्ता कोणाच्या हातात जाणार, याबाबत मोठी उत्सुकता होती. मात्र निकाल जाहीर होताच महायुतीने सर्व जागांवर निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आणि विरोधकांना पूर्णपणे नामोहरम केले. या निवडणुकीत महाविकास आघाडीला खातेही उघडता आले नाही, हे या विजयाचे महत्त्व अधिक अधोरेखित करते.

या निकालामागे रत्नागिरीतील नेतृत्वाची ताकद स्पष्टपणे दिसून आली आहे. उदय सामंत आणि योगेश कदम हे दोघेही महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असून त्यांनी जिल्ह्यातील संघटन मजबूत करण्यावर भर दिला होता. विशेषतः खेडमध्ये योगेश कदम यांनी प्रभावी प्रचार, स्थानिक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणारी रणनीती आणि महायुतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय साधत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. योगेश कदम हे शिवसेना नेते रामदास कदम यांचे पुत्र असून रामदास कदम यांनी काही काळापूर्वी उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या पार्श्वभूमीवरही खेडमधील हा निकाल राजकीयदृष्ट्या अधिक महत्त्वाचा मानला जात आहे.

## नगरपरिषद निकालानंतर शरद पवार गटात अस्वस्थता
# कौल निराशाजनक : रोहित पवार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :



राज्यातील 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट नगराध्यक्ष पदासाठी आज मतमोजणी पार पडली. या निकालांमधून राज्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली असून महायुतीतील घटक पक्षांनी मोठा विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली आहे. भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या सत्ताधारी आघाडीला अनेक ठिकाणी अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले आहे. त्याउलट महाविकास आघाडीला मात्र या निवडणुकांमध्ये मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले असून अनेक नगरपरिषदांमध्ये आघाडीचे खातेही उघडता आले नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या निकालांनंतर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अस्वस्थता स्पष्टपणे जाणवू लागली आहे. आमदार रोहित पवार यांनी या निकालांबाबत उघडपणे नाराजी व्यक्त करत तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी हा निकाल अत्यंत निराशाजनक असून तो प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात नैराश्य निर्माण करणारा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, उमेदवारांनी केलेली धडपड आणि जनतेसमोर ठेवलेली भूमिका असूनही अपेक्षित यश मिळाले नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. रोहित पवार यांनी सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त करत सांगितले की, जनतेने दोन वेळा भरभरून मतांचे दान दिले असून त्याचे ऋण ते कायम मान्य करतील.

# पुणे जिल्ह्यात १७ पैकी ९ नगरपालिकांवर राष्ट्रवादी काँग्रेसचा नगराध्यक्ष

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २१ :

पुणे जिल्ह्यातील 17 नगरपालिकांपैकी 9 नगरपालिकांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष निवडून आले आहे. त्यामुळे अजित पवार हेच पुणे जिल्ह्याचे कारभारी असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अखेर राज्यातील नगरपंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्यात. आज झालेल्या मतमोजणीत भाजप हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला असून, सत्ताधारी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीतील काँग्रेस वगळता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा कोणताही करिश्मा या निवडणुकीत चालला नाही. त्यांना एक आकडी संख्येतच समाधान मानावे लागले. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी आपला पुणे व पिंपरी चिंचवडा बालेकिल्ला राखण्यात यश मिळवले आहे.

पुण्याला चिकटून असणारे पिंपरी - चिंचवड हे शहर अजित पवारांचा बालेकिल्ला होता. पण 2017 च्या निवडणुकीत भाजपने या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला. त्यांनी राष्ट्रवादीची 15 वर्षांची सत्ता उलथवून टाकली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी चिंचवडकडे विशेष लक्ष दिले. पण निवडणुका जाहीर झाल्यानंतर अजित पवारांनी पुणे, पिंपरी - चिंचवड व ग्रामीण पुण्यात जातीने लक्ष घातले. जनसंपर्कावर अधिक भर दिला. त्याचे फळ त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मिळाले आहे.

## लोकलमधून तरुणीला ढकलले

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

पनवेल परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि अस्वस्थ करणारी घटना समोर आली असून, सकाळी पनवेल ते खांदेश्वर रेल्वे स्थानकांदरम्यान धावत्या लोकलमधून एका 18 वर्षीय अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीला खाली ढकलण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी पनवेल रेल्वे स्थानकावरून सीएसएमटीच्या दिशेने जाणा ऱ्या लोकलमध्ये चढली होती. लोकल सुटण्याच्या काही अचानक शेख अख्तर नवाज हा इसम महिलांच्या डब्यात घुसला. महिलांनी त्याला जाब विचारत खाली उतरण्याची विनंती केली. काही क्षणांतच हा वाद चिघळला. संतापाच्या भरात आरोपीने 18 वर्षीय विद्यार्थिनीला जोरदार धक्का दिला.

# विजय निवडणूक आयोगाच्या आशिर्वादाने : हर्षवर्धन सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाचा गलथान कारभार अधिरेखीत झाला आहे. मतदार प्रक्रियेचा पुरता गोंधळ घातला गेला, तारिख पे तारिख चा खेळ केला. ही निवडणूक फ्रि अँड फेअर अशी झाली नाही. सत्ताधारी पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद या नितीचा मुक्तपणे वापर करण्यात आला. निवडणुकीत बोगस मतदार, दडपशाही, सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा प्रचंड वापर पहायला मिळाला. सत्ताधारी पक्षांच्या विजयात निवडणूक आयोगाची मदत सर्वात महत्वाची ठरली आहे, अशी प्रतिक्रीया महाराष्ट्र प्रदेश



काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

निवडणूक निकालावर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या कामावर जनता प्रचंड नाराज आहे. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे, जनतेची कामं होत नाहीत, अशा परिस्थितीत आज आलेले निकाल जनतेचा कौल वाटत नाही. लोकशाही व संविधानाची पायमल्ली करत खुलेआमपणे दडपशाही करण्यात आली. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहे. निवडणूक आयोगाचा गोंधळी कारभार व सत्ताधारी पक्षांचा पैसा फेक तमाशा देख, हा खेळ या निवडणुकीत पहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालेले नाही. काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नसले तरी काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधान रक्षणासाठी संघर्ष करत राहिल, आमची ही वैचारिक लढाई आहे असे सपकाळ म्हणाले.

नगरपालिका निवडणुकीत भाजपाला मिळालेले यश हे एकनाथ शिंदेंची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी धोक्याची घंटा आहे. शत प्रतिशत भाजपासाठी या दोन मित्रपक्षांना भाजपा बाहेरचा रस्ता दाखवेल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# राज्यात मतमोजणीला गालबोट

## नाशकात दोन गटांत हाणामारी, संभाजीनगरमध्ये दगडफेक

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २१ :

राज्यातील 288 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत दणदणीत यश संपादन केले आहे. एकूण जागांपैकी सुमारे 213 जागांवर महायुतीचे नगराध्यक्ष निवडून आले असून, महाविकास आघाडीला 51 जागांवर समाधान मानावे लागले आहे. मात्र, विजयाचा हा गुलाल उधळला जात असतानाच नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि धुळे जिल्ह्यांत निकालाच्या रागातून हिंसक घटना घडल्याने निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागले आहे.

राज्यातील निकालांचे अधिकृत आकडे समोर आले असून पक्षनिहाय आकडेवारीनुसार, भाजपने सर्वाधिक 118 जागांवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने 58 जागा जिंकत आपली ताकद दाखवून दिली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला 37 जागांवर दुसरीकडे, महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस पक्षाचे 31 नगराध्यक्ष निवडून आले आहेत. या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा फटका बसला असून, दोन्ही पक्षांना केवळ 10 नगराध्यक्षपदांच्या जागा जिंकता आल्या. विजयाचा जल्लोष सुरू असतानाच नाशिकच्या येवला नगरपालिकेतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रभाग क्रमांक चारच्या निकालानंतर शहरातील मोमीनपुरा भागात दोन गटांत तुफान हाणामारी झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव जिव्हारी लागल्याने हा वाद उफाळल्याचे समजते. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार रुपेश दराडे यांच्या कार्यकर्त्यांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला.



### संभाजीनगरमध्ये पराभूत उमेदवारांकडून दगडफेक

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणमध्येही निकालाचा राग दगडफेकीतून बाहेर पडला. येथे चक्क दोन पराभूत उमेदवारांचे गट एकमेकांशी भिडले. आपल्या पराभवासाठी एकमेकांना जबाबदार धरत पैठणच्या नेहरू चौकात दोन्ही गटांकडून जोरदार दगडफेक करण्यात आली. या हिंसक वळण घेतलेल्या वादात पाच जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी वेळीच मध्यस्थी केल्याने पुढील अनर्थ टळला असला तरी शहरात अद्याप तणावाचे वातावरण आहे.

## एकाच घरातील सहा उमेदवार आणि सहाही पराभूत!

■ महासागर प्रतिनिधी, नांदेड, दि. २१ :

नांदेड जिल्ह्यातील लोहा नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसला आहे. नगराध्यक्ष, नगरसेवक पदासाठी भारतीय जनता पक्षाने एका घराण्यातील सहा जणांना उमेदवारी दिली होती, मात्र मतदारांनी घराणेशाहीला थारा नसल्याचे दाखवत या सर्व उमेदवारांना नाकारले. नगराध्यक्षपदासाठी भाजपने गजानन सूर्यवंशी यांना उमेदवारी दिली होती, तर नगरसेवक पदासाठी पत्नी गोदावरी सूर्यवंशी, भाऊ सचिन सूर्यवंशी, भावाची पत्नी सुप्रिया सचिन सूर्यवंशी, मेव्हुणा युवराज वाघमारे आणि भाच्याची पत्नी रिना अमोल व्यवहारे यांना निवडणुकीत उतरवले होते.

मतदानानंतर झालेले निकाल पाहता, नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवला आहे. लोहा नगरपरिषदेतील एकूण 10 प्रभागांसाठी 20 नगरसेवक पदांसाठी लढत झाली, ज्यात भाजपने सर्व जागांवर उमेदवार रिंगणात उतरवले होते. मात्र, घराणेशाहीवर आधारित ही रणनीती जनतेला पटली नाही आणि सर्व उमेदवार पराभूत झाले. लोहा नगरपरिषदेच्या या निकालामुळे भाजपच्या स्थानिक नेतृत्वाला विशेषतः खासदार अशोक चव्हाण यांना धक्का बसला आहे. भाजपकडून नेहमी काँग्रेसवर घराणेशाहीचे आरोप केले जात असताना, स्वतःच्या घराण्यातील उमेदवारांना तिकीट देऊन हा प्रकार घडल्याने राजकीय वतुर्ळात चचेर्ला बळी पडले आहे. मतदारांनी स्थानिक राजकारणात स्पष्ट संदेश दिला असून, घराणेशाहीवर मतदारांचा विश्वास संपला असल्याचे समोर आले आहे.

# 'हिंगोली जिल्हा एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला'

■ महासागर प्रतिनिधी
हिंगोली, दि. २१ :

हिंगोली जिल्हा एकनाथ शिंदेचा बालेकिल्ला आहे अशा घोषणादेत आमदार संतोष बांगर यांनी हिंगोली व कळमनुरी पालिकेच्या विजयाचा जल्लोष केला. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकीसाठी दंड थोपटले तर मांड्या थोपटून विरोधकांना एक प्रकारे इशारा दिला आहे.

हिंगोली व कळमनुरी पालिकेच्या निवडणुकीत शिंदेसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी विशेष लक्ष दिले होते. दोन्ही जागेवर शिंदेसेनेचे उमेदवार विजयी व्हावे यासाठी त्यांनी मागील सहा महिन्यापासून रणनिती आखली होती. त्यामुळे काही कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देऊन पक्षाची बाजू भक्कम करून ठेवली होती.

दरम्यान, हिंगोलीत भाजपा व राष्ट्रवादी हे दोन्ही मित्रपक्ष विरोधात होते. तर हिंगोलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भाजपा उमेदवारासाठी सभा देखील झाली होती. मात्र त्यानंतरही आमदार बांगर यांनी एक हाती किल्ला लढविला. कळमनुरीतही भाजपा, राष्ट्रवादी हे मित्र पक्ष विरोधातच होते. मात्र या दोन्ही ठिकाणी मित्रपक्षांकडूनच आव्हान उभे झाल्यामुळे आमदार बांगर यांच्यासाठी दोन्ही पालिकेच्या निवडणुका प्रतिष्ठेच्या झाल्या होत्या.

दरम्यान, आज मतमोजणीनंतर अवघ्या दोन तासातच कळमनुरीचा नगराध्यक्षपदाचा निकाल हाती आला अन शिंदेसेनेच्या आश्लेषा चौधरी विजयाची घोषणा झाली. त्यानंतर दुपारच्या सुमारास हिंगोलीचा निकाल जाहिर झाला अन शिंदेसेनेच्या रेखा श्रीराम बांगर विजयी झाल्याची घोषणा झाली अन शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

हिंगोली पालिका निवडणुकीत शिंदेसेनेच्या उमेदवार तब्बल १० हजार पेक्षा अधिक मतांनी विजयी झाल्यानंतर मिरवणूक काढण्यात आली.

# उरणमध्ये मतमोजणीआधी हायहोल्टेज राडा : 'नाष्ट्याचा कॉन्ट्रॅक्टर' स्ट्राँग रूमकडे गेल्याने गोंधळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

राज्यभरातील नगरपंचायती आणि नगरपालिकांच्या मतमोजणीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच रायगडच्या उरणमध्ये एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. "नाष्ट्याचा कॉन्ट्रॅक्टर" असल्याचे सांगून एका अज्ञात इसमाने थेट स्ट्राँग रूमच्या दिशेने प्रवेश केल्यामुळे मतमोजणी केंद्राबाहेर मोठा राडा झाला. या प्रकारावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी तीव्र आक्षेप घेतला असून, प्रशासनाच्या हेतूवर शंका उपस्थित केल्यामुळे केंद्रावर काही काळ तणावाचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी मतमोजणीची प्रक्रिया सुरू होण्यासाठी अवघे काही मिनिटे शिल्लक असताना हा प्रकार घडला. मतमोजणी केंद्राचा परिसर पूर्णपणे प्रतिबंधित असताना आणि कडक पोलिस बंदोबस्त तैनात असताना, एक व्यक्ती स्वतःला नाष्ट्याचा कंत्राटदार असल्याचे सांगत स्ट्राँग रूमच्या अत्यंत जवळ पोहोचली. हा प्रकार तिथे उपस्थित असलेल्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित व्यक्तीला अडवले आणि जाब विचारण्यास सुरुवात केली. यामुळे केंद्राबाहेर एकच गोंधळ उडाला.

या गंभीर सुरक्षा त्रुटीमुळे महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर आक्रमक झाल्या. त्यांनी थेट तहसीलदारांकडे धाव घेत प्रशासनाला धारेवर धरले. "मतमोजणी सुरू होण्यापूर्वी केंद्रात कोणालाही प्रवेश निषिद्ध असताना, हा इसम स्ट्राँग रूमच्या इतक्या जवळ गेलाच कसा? त्याला कोणी परवानगी दिली?" असा संतप्त सवाल घाणेकर यांनी उपस्थित केला. या प्रकारामुळे मतमोजणीत फेरफार होण्याची भीती व्यक्त करत मविआ नेत्यांनी केंद्रावर जोरदार घोषणाबाजी केली.

परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून घटनास्थळी तैनात असलेल्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप केला. संबंधित संशयास्पद व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची चौकशी करण्यात येत आहे. पोलिसांनी सध्या मतमोजणी केंद्रावरील परिस्थिती नियंत्रणात आणली असून, उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर खात्री पटवून दिल्यानंतर मतमोजणीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.



## भाजपावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मतदारांचे आभार

### विकास, सेवा, सुशासनला मतदारांचा कौल – भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर

अकोला:नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला दणदणीत यश देऊन मतदारांनी विकास, सेवा, सुशासनला कौल दिला आहे. १२५ पेक्षा अधिक जागांवर भाजपाचा विजय आणि ११०० पेक्षा अधिक नगरसेवक निवडून दिले आहेत. जिल्ह्यात ५५ तर नगराध्यक्ष चार ठिकाणी भाजपाचे विजयी झाले हा भाजपावर मोठा विश्वास दाखविल्याबद्दल जनतेचे आभार मानतो असे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आणि अकोला जिल्हा प्रभारी आमदार रणधीर सावरकर यांनी केले.

## जिल्ह्यात भाजपाचे चार,काँग्रेस एक व वंचितचा एक नगराध्यक्ष विजयी

# अकोट मतदार संघात तिन्ही नगरपालिकांवर भाजपाची सत्ता








**अकोला जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतच्या निवडणुकीचे आज निकाल जाहीर झाले त्यामध्ये जिल्ह्यातील चार नगरपालिकेवर भाजपा विजयी झाली असून बाळापुर नगर परिषदेत काँग्रेस चा उमेदवार नगराध्यक्ष निवडून आला तर बार्शीटाकळी नगरपंचायत वंचित च्या नगराध्यक्ष निवडून आल्याअकोट नगराध्यक्षपदी भाजपाच्या सौ. मायाताई धुळे, तेल्हारा नगराध्यक्षपदी भाजपाच्या सौ. वैशालीताई जितेंद्र पालीवाल मूर्तिजापूर नगराध्यक्षपदी भाजपाचे हर्षल साबळे हिवरखेड नगराध्यक्षपदी भाजपाच्या सौ. सुलभाताई दुतोंडे विजयी झाले असून बार्शीटाकळी नगरपंचायत अध्यक्षपदी अपक्ष अख्तरा खातून तर बाळापुर नगराध्यक्षपदी काँग्रेस च्या डॉ. आफ्रीन विजय.**

(विशेष प्रतिनिधी)

अकोट विधानसभा मतदारसंघातील तिन्हीही नगरपरिषदेवर भाजपाची सत्ता विजयी झाली असून तिन्ही नगराध्यक्षा भाजपाच्या विजयी झाल्या तर नगरसेवकांचे सत्ताबळ सुद्धा भाजपाचेच जास्त निवडून आले आहेत.हिवरखेडची नव्यानेच नगरपालीका झाल्यामूळे ईथे पहील्या नगराध्यक्षाचा म ान नगरपरीषद होन्यासाठी जिल्हापरीषद सदस्यपदाचा राजीनामा देर्नाया सौ सूलभा ताई रमेश दुंतोडे यांना हिवरखेडच्या प्रथम नगराध्यक्ष थेट जनतेतुन निवडून येन्याचा बहुमान मिळाला असून जनतेनी महाराष्टाचे देवेद्रजी फडनवीस असलेल्या लाडक्या मूख्यमंत्र्याचे आव्हानाला साद देत व जिल्ह्याचे यूवा खासदार अनूपदादा धोत्रे प्रदेशाचे प्रदोत शेतकरी नेते आमदार रणधिरभाऊ सावरकर पालकमंत्री आकाश फ ुंडकर यांच्यावर असलेला विर्श्वास आनी त्या वीर्श्वासाला तडा न जाऊ देर्नाया लाडक्या बहीनीचा भाजपावर असलेला विर्श्वासामूळे आनी विकासमहर्षी आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे यांची चाणक्यनीती व रमेशभाऊ दुंतोडे जनसपर्क राजकारनातील दाडंगा अनूभव त्यांनी केलेल्या जनतेच्या कामाची पावती म्हनून मतदारानी त्यांच्यावर विर्श्वास ठेवत तसेच बुथलेवलचा कार्यकर्त्याच्या भाजपाचे जेष्ट पदाधिकारी याचे मोलाचे मार्गदर्शन कार्यकर्त्याचे जिवापाड घेतलेली मेहनतीच्या भरवश्यावर भाजपाच्या सौ सूलभाताई रमेश दूंतोडे नगराध्यक्षपदी व ईतर अकरा ऊमेदवार जनतेनी निवडून दिले असून केद्रात भाजपा महाराष्टात यूती तर हिवरखेड मधे हि भाजपाचा झेंडा लागला असून विकासाची गंगा येन्यासाठी जनतेच्या विर्श्वास मार्गी लागल्याचे जनता (पान ६ वर)

## मुर्तीजापुर नगराध्यक्षपदी भाजपाचे हर्षल साबळे विजयी

मूर्तिजापूर नगरपरिषद निवडणुकीनंतर शहराच्या कारभाराची सूत्रे नव्या नेतृत्वाकडे आली असून, नगराध्यक्ष म्हणून भाजपाचे हर्षल रामेश्वर साबळे यांची अधिकृत निवड झाली आहे. त्यांच्यासोबत विविध पक्षांचे व अपक्ष असे एकूण २५ नगरसेवक नगरपरिषदेच्या सभागृहात दाखल झाले आहेत.

नगरपरिषदेत भाजपाने बहुसंख्य प्रभागांत आपली ताकद कायम ठेवली असून, वंचित बहुजन आघाडी, शिंदे गट, शरद पवार राष्ट्रवादी तसेच अपक्ष उमेदवारांचीही लक्षणीय उपस्थिती राहिली आहे. त्यामुळे आगामी काळात नगरपरिषदेत राजकीय हालचालींना वेग येणार असल्याचे संकेत आहेत.

**निवडून आलेले नगरसेवक पुढीलप्रमाणे**

प्रभाग १ मधून शुभांगी संदीप सरनाईक व संदीप दौलतराव सरनाईक (अपक्ष).प्रभाग २ मधून सुनंदा नंदू सोंळके व तसवर खान तसलीम खान (वंचित).प्रभाग ३ मधून राहुल विनोद गुल्हाने व शालिनी राम हजारे (भाजपा).प्रभाग ४ मधून कुरेशी शमीम बानो अब्दुल रफीक व अ. बाकी अ. अजीज (वंचित).प्रभाग ५ मधून निजामुद्दीन इस्लामाद्दीन व पटेल फहेमीदाबी कलीमोद्दीन (वंचित).प्रभाग ६ मधून लखन धर्मदास मिलांदे (भाजपा) व घाणिवाला बिलकीस बानो इब्राहीम (शरद पवार राष्ट्रवादी).प्रभाग ७ मधून पंकज चंद्रशेखर कांबे व सोनल मुकेश काळपांडे (भाजपा).प्रभाग ८ मधून भूपेंद्र मारोती आप्पा पिंपळे (भाजपा) व मम ता कैलास महाजन (अपक्ष).प्रभाग ९ मधून पूजा राजेश अरोरा व निलेश रमेश शर्मा (शिंदे गट).प्रभाग १० मधून प्रज्ञा निलेश वानखडे व रोहित मधुकर अव्वलवार (भाजपा).प्रभाग ११ मधून पूनम रविंद्र मारकड (शरद पवार राष्ट्रवादी) व सचिन सुरेशराव पावडे (देशम ुख गट-भाजपा).प्रभाग १२ मधून सरिता राहुल पाटील (अपक्ष), गजानन मुकुटराव नाकट व सुप्रिया राम खंडारे (भाजपा).

नव्या नगराध्यक्षांसह स्थापन झालेल्या या नगरपरिषदेकडून शहरातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि नागरी प्रश्नांवर ठोस निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे. नवे चेहरे, नवी सत्ता आणि विकासाच्या अपेक्षाङ्कया पार्श्वभूमीवर मूर्तिजापूरच्या राजकारणात नवे



पर्व सुरू झाले आहे.

## तेल्हारा नगराध्यक्ष पदी भाजपाच्या वैशालीताई जितेन्द्र पालीवाल विजयी

**✻ भाजपाचे नगरसेवक १३ जागेवर झाले विजयी ✻ वंचित बहुजन आघाडी व शेतकरी पॅनल पाच जागेवर विजयी ✻ एका जागेवर अपक्षाची बाजी ✻ नगरसेवा समितीने एक जागेवर मिळवला विजय**

**तेल्हारा :** संपूर्ण तेल्हारा तालुक्याचे लक्ष वेधून घेणाऱ्या तेल्हारा नगर पालिकेच्या सार्वजनिक निवडणूकीची मतमोजणी आज बेलखेड रोड नगरपालिकेच्या केशव बळीराम हेडगेवार मंगल कार्यालयात पार पडली असुन यामध्ये भाजपाच्या सौ वैशालीताई जितेंद्र पालीवाल यांनी ४६९४ मते घेवून विजयी मिळिवली त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या सौ शिवाणी सचिन थाटे यांना ३४५२ मतावर समाधान मानावे लागले तर भाजपाने विस जागे पैकी १३ जागेवर विजय मिळवला आहे, शेतकरी पॅनल व वंचित बहुजन आघाडीने पाच जागेवर विजय मिळवला आहे तर नगरसेवा समितीने एका जागेवर विजय मिळवला आहे तर एका जागेवर अपक्षाने बाजी मारली आहे.




प्रभाग क्रमांक १ मधुन भाजपाचे सतिष रमेश जयस्वाल ७०९ मते घेवून विजयी झाले आहे प्रभाग क्रमांक ब मधुन शेतकरी पॅनल व वंचित बहुजन आघाडी च्या सौ कान्होपात्रा रामभाऊ फाटकर ५५१मते घेवून विजयी झाल्या आहेत प्रभाग क्रमांक २ अ मधुन भाजपाच्या सौ अरुणा मंगेश ठाकरे ८२२ मते घेवून विजयी झाल्या आहेत.

प्रभाग क्रमांक २ ब मधुन नगरसेवा समितीचे विजयसिंह जयसिंह बलोदे ५८७ मते घेऊन विजयी झाले आहेत प्रभाग क्रमांक ३ अ मधुन भाजपाच्या गायत्री मंगेश सोळंके ७३२ मते विजयी झाल्या आहेत प्रभाग क्रमांक ३ ब मधुन भाजपाचे जितेन्द्र मुलचंद राठी ६१६ मते घेवून विजयी झाले आहेत प्रभाग ४ अ मधुन भाजपाचे प्रशांत शंकरराव विखे ६१७ मते घेऊन विजयी झाले आहेत प्रभाग क्रमांक ४ ब मधून भाजपाच्या सौ भक्ती दिपक छांगाणी ह्या ७१२ मते घेऊन विजयी झाल्या आहेत प्रभाग क्रमांक ५ अ मधुन भाजपाच्या साक्षी विठ्ठलराव वानखडे यांनी ६२३ मते घेवून विजय मिळवला प्रभाग क्रमांक ५ ब मधून अपक्ष अमित उमेश अग्रवाल यांनी ६५९ मते घेवून विजय मिळवला प्रभाग क्रमांक ६ अ मधुन भाजपाच्या संध्या विशाल गावत्रे यांनी ५१६ मते घेवून विजय मिळवला प्रभाग क्रमांक ६ मधुन ब मधून भाजपाचे रूपेश गजानन चव्हाण यांनी ५१६ मते घेवून विजय मिळवला प्रभाग क्रमांक ७ अ मधुन भाजपाच्या रुपाली रामेश्वर हागे यांनी ४४५ मते घेऊन विजय मिळवला प्रभाग क्रमांक ७ ब मधून भाजपाचे सचिन तुळशीराम तायडे ५०१ मते घेवून विजयी झाले प्रभाग क्रमांक ८ अ मधुन भाजपाच्या जया विजय बघ्घन ४७९ मते घेऊन विजयी झाल्या प्रभाग क्रमांक ८ ब मधून शेतकरी पॅनल व वंचित बहुजन आघाडीचे कैलास नारायणराव ठोकणे ६८२ मतानी विजयी झाले प्रभाग क्रमांक ९ अ मधुन भाजपाचे प्रविण पंजाबराव ढोके ७३० मते घेवून विजयी झाले प्रभाग क्रमांक ९ ब मधुन शेतकरी पॅनल वंचित बहुजन आघाडीच्या पंचफुला श्रीकृष्ण कवर ७१६ मते घेवून विजयी झाले आहेत प्रभाग क्रमांक १० अ मघुन शेतकरी पॅनल व वंचित बहुजन आघाडीचे राजेश रमेशराव खारोडे ५०८ मते घेवून विजयी झाले आहेत प्रभाग क्रमांक १० ब मधून शेतकरी पॅनल व वंचित बहुजन आघाडीच्या रिना मुकेश आसरे यांनी ३०५ मते घेऊन विजय मिळवला आहे.

## अकोला विकसित करण्यासाठी भाजपाचाच पर्याय : चंद्रशेखर बावनकुळे

### महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला यश कार्यकर्त्यांच्या बळावर विजय निश्चित

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

अकोला शहराला विकसित व समृद्ध महानगर बनविण्याच्या संकल्पासाठी आगामी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना जनता जनार्दन निश्चितपणे निवडून देईल, असा ठाम विश्वास भाजपा महाराष्ट्र निवडणूक प्रभारी तथा राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते अकोला येथील सिटी स्पोर्ट्स येथे आयोजित भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जयंत म्हसने होते.

नामदार बावनकुळे म्हणाले की, कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असून कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष आहे. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या विकासकामांची माहिती पत्रकांच्या माध्यमातून घरोघरी पोहोचवावी, असे त्यांनी आवाहन केले. भाजपाच्या लोकप्रियतेमुळे व जनतेच्या विश्वासामुळे आज इतर पक्षांचे कार्यकर्ते ही भाजपामध्ये प्रवेश करण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी नमूद केले. महानगरपालिका निवडणूक जिंकण्यासाठी नामदार बावनकुळे यांनी २१ सूत्री विजयाचा मंत्र देत मायक्रो प्लॅनिंगच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले. जनता मोदी व फडणवीस सरकारच्या कामकाजावर समाधानी असून त्यामुळे मनपा निवडणुकीत भाजपाला यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी विविध शासकीय योजनांची माहितीही दिली. भाजपा संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर यांनी सांगितले की, भाजपा कार्यकर्ता हा 'देवदुर्लभ' कार्यकर्ता असून तो स्वतःचा व्यवसाय सांभाळत राष्ट्रनिर्माणासाठी झटत असतो. या कार्यकर्त्यांच्या बळावरच भाजपा देशातील सर्वात मोठी संघटना बनली असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही भाजपाला मोठे यश मिळेल. प्रत्येक प्रभागात महिला व विविध समाजघटकांशी संवाद साधण्यासाठी कार्यकर्त्यांची स्वतंत्र टीम कार्यरत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. ३१ डिसेंबरपर्यंत विविध कार्यक्रम राबविण्यात येणार असून अकोला महानगरात भव्य संमेलन घेण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

यावेळी मंचावर भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, किशोर पाटील, वैशालीताई शेळके, अर्चनाताई मसने उपस्थित होते. आमदार रणधीर सावरकर यांनी महायुतीबाबत चर्चा सुरू असून लवकरच त्याचे स्वरूप जनतेसमोर येईल, असे सांगितले. खासदार अनुप धोत्रे यांनी विजयासाठी कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने कामाला लागावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाला डॉ. अमित कावरे, वसंत बाचूका, कृष्णा शर्मा, म ाधव मानकर, ॲड. देवआशिष काकड, संजय गोटफफोडे, रमेश अलकरी, आम्रपाली उपरवत, संजय जोशी, संजय शर्मा, सिद्धार्थ शर्मा, डॉ. अभय जैन, डॉ. किशोर मालोकार, विनोद मनवानी यांची उपस्थिती होती.

# रेल्वे प्रवाशांना 'किरकोळ' दणका;२६ डिसेंबरपासून नवे भाडेदर लागू

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

भारतीय रेल्वेने प्रवासी भाडे रचनेत काही सुधारणा करण्याचा निर्णय घेतला असून २६ डिसेंबर २०२५ पासून नवीन भाडेदर लागू होणार आहेत. विशेष म्हणजे, या निर्णयामुळे उपनगरीय (लोकल) रेल्वे तसेच मासिक पासधारकांना कोणताही फटका बसणार नाही. मात्र, लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी प्रवाशांना आता थोडे अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

**काय आहेत नवीन दर?**

रेल्वेने जाहीर केलेल्या नवीन भाडे रचनेनुसार साधारण वर्गात २१५ किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी कोणतीही दरवाढ करण्यात आलेली नाही. मात्र, २१५ किलोमीटरपेक्षा जास्त अंतरासाठी प्रति किलोमीटर १ पैसा वाढवण्यात आला आहे. तसेच मेल व एक्सप्रेस गाड्यांच्या नॉन-एसी आणि सर्व एसी कोचसाठी प्रति किलोमीटर २ पैसे अतिरिक्त आकारण्यात येणार आहेत.

उदाहरणार्थ, एखाद्या प्रवाशाने नॉन-एसी कोचमधून ५०० किलोमीटरचा प्रवास केल्यास त्याला केवळ १० रुपये अतिरिक्त भाडे द्यावे लागेल. या किरकोळ दरवाढीमुळे चालू आर्थिक वर्षात रेल्वेला सुमारे ६०० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे.

गेल्या दशकात रेल्वेचे जाळे तसेच गाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्याचबरोबर रेल्वेच्या संचालन खर्चातही लक्षणीय वाढ झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार कर्मचारी पगारांवर सुमारे १,१५,००० कोटी रुपये, तर पेन्शनवर सुम ारे ६०,००० कोटी रुपयांचा खर्च होतो. २०२४-२५ या आर्थिक वर्षात रेल्वेचा एकूण संचालन खर्च सुमारे २,६३,००० कोटी रुपये इतका आहे. वाढलेला खर्च भरून काढण्यासाठी रेल्वे प्रशासनाने म ालवाहतुकीत वाढ करण्यासोबतच प्रवासी भाड्यात अत्यल्प बदल करण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

रेल्वे प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, या भाडेवाढीतून मिळणारा निधी सुरक्षितता आणि प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या सणासुदीच्या काळात रेल्वेने १२,००० हून अधिक विशेष गाड्या यशस्वीरित्या चालवून आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. भारत आता जगातील दुसरी सर्वाधिक मालवाहतूक करणारी रेल्वे व्यवस्था बनली असून सामाजिक जबाबदारी जपत खर्च नियंत्रण आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी रेल्वे सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रवाशांना थोडा आर्थिक भार सोसावा लागेल हे खरे असले, तरी भारतीय रेल्वेचा कायापालट होत असताना रेल्वेचे नवे जाळे, आधुनिक सोयी-सुविधा आणि वेगवान गाड्यांच्या भविष्यासाठी ही अल्प भाडेवाढ गरजेचीच आहे.



अकोला महानगरपालिका आचारसंहिता जाहिर झाल्यापासून प्रशासनाकडून शहरातील विविध पक्षाचे फ्लेक्स बॅनर अशा प्रकारे झाकण्यात आले आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेकडुन मोटार सायकल चोरी करणारी टोळी गजाआड

## ७ गुन्हे उघकीस एकूण ६,१०,००० रु चा मुद्देमाल जप्त

■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :

स्थानिक गुन्हे शाखेकडुन मोटार सायकल चोरी करणारी टोळी गजाआड, ०७ गुन्हे उघकीस एकूण ६,१०,०००/- रु चा मुद्देमाल जप्तपो.स्टे सिव्हील लाईन अकोला येथे दिनांक २०/१२ /२०२५ रोजी फि नामे राहुल पुंडलीक ठाकरे वय ३० वर्ष रा-दर्यापुरता. अंजनगांव जि. अमरावती ह.मु.मच्छींद्र नगर, लहानउमरी अकोला याने पो.स्टे सिव्हील लाईन अकोला येथे येवुन जबानी रिपोर्ट दिला कि त्याने दि. १९/१२/२०२५ रोजी रात्री ०८/०० वा दरम्यान त्याची मो.सा एचएफ डीलक्स एमएच २७डीजी २२३५ ही घेवुन घरी घेवुन येवुन रात्री मो.सा उभी करून घरात झोपला व दिनांक २०/१२ /२०२५ रोजी सकाळी ०५/३० वा घराबाहेर आला असता फि यांने लावलेली त्याची मो.सा क्रमांक एचएफ डीलक्स एमएच २७डीजी २२३५ दिसुन आली नाही वरून आजुआजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही वरून पो.स्टे ला फि।। याने मो.सा. किं.अं. ३५०००/-रु कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याबाबत रिपोर्ट दिल्याने सदर बाबत पो.स्टे सिव्हील लाईन अकोला येथे अप.क्र ५०५/२०२५ कलम ३०३ (२) बिएनएस नुसार गुन्हा दाखल करून तपासात घेतला.




स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी तांत्रीक विश्लेषन व गोपनिय माहितीवरून वाशिम येथुन आरोपी नामे (१) राम विठ्ठलसिंह ठाकुर वय २३ वर्ष रा पंचशील नगर, गल्ली नंबर ०२, रेल्वे स्टेशन, वाशिम., (२) सुरज रविंद्र लांडेकर वय १८ वर्ष रा रा पंचशील नगर, गल्ली नंबर ०२, रेल्वे स्टेशन, वाशिम., (३) प्रकाश रवि जाधव वय १८ वर्ष रा मोठा गवळीपुरा, गोकुळची पानपट्टी जवळ, वाशिम यांना वाशिम येथे शिताफीने ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी संगनमत करून अकोला शहरातुन वेगवेगळ्या ठिकाणावरून एकुण ०६ मोटार सायकल तसेच शेगाव शहर जि. बुलढाणा येथुन ०१ मोटार सायकल अश्या एकुण ०७ मोटार सायकल चोरी करून वाशिम येथे घेवुन जावुन कमी किमतीत विक्री करण्याचे बेतात असतांना त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन वेगवेगळया कंपणीच्या ०७ मोटार सायकल व ०३ वेगवेगळ्या कंपणीचे मोबाईल असा एकुण ०६, १०,०००/ रु चा मुद्देमाल जप्त करून एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

सदरीची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक सा. श्री अर्चित चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक बी चंद्रकांत रेड्डी साहेब, पोलीस निरीक्षक श्री शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि विजय चव्हाण, पो.उप.नि गोपाल जाधव, विष्णु बोडखे, माजीद पठाण, पोलीस अमंलदार शेख हसन, भास्कर धोत्रे, अब्दुल माजीद, वसीमोद्दीन, किशोर सोनोने, महेद्र मलीये, रव्रिद खंडारे, एजाज अहमद, अमोल दिपके, श्रीकांत पातोंड, अशोक सोनोने, अन्सार अहमद, आकाश मानकर चालक प्रशांत कमलकार, देवानंद खरात यांनी केली आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया यावेळी नवीन वर्षात!

■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :

आरटीई अर्थात शिक्षण हक्क कायदा अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी खासगी शाळांमध्ये राखीव असलेल्या २५ टक्के जागांसाठीची प्रवेश प्रक्रिया जानेवारी महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेत १ किमी परिसरातील - विद्यार्थ्यांना शासकीय तसेच खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेश दिला जाणार असून, यंदा प्रवेश प्रक्रियेत काही महत्त्वाचे बदल होण्याचीही शक्यता आहे. यासंदर्भातील नवीन अधिसूचना येत्या काही दिवसांत जाहीर होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी आरटीई प्रवेश प्रक्रियेला डिसेंबर महिन्यातच सुरुवात करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑगस्ट-सप्टेंबरपर्यंत पूर्ण झाली होती. हाच अनुभव लक्षात घेता यंदाही प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत.

## चान्नी पोलिसांचा अवैध पेट्रोल विक्रीवर छापा

■पातूर,दि २१ (प्रतिनिधी) :

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक अकोला यांच्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध धंद्यांवर कडक कारवाई सुरू असून, त्याच अनुषंगाने चान्नी पोलिसांनी अवैध पेट्रोल विक्रीवर छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. २० डिसेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, चान्नी पोलीस ठाण्याच्या पथकाने ग्राम मळसूर येथील श्रेयश ऑटोमोबाइल येथे छापा टाकला. सदर ठिकाणी कोणताही परवाना नसताना पेट्रोलची साठवणूक करून विक्री केली जात असल्याचे उघडकीस आले. या कारवाईत आरोपी उमेश सुपाजी ढोकणे, रा. मळसूर याच्याकडून निळ्या रंगाच्या कॅनमध्ये साठवलेले २५ लिटर पेट्रोलसदृश द्रव्य अंदाजे किंमत २ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढीलतपास सुरूआहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी बाळापूर गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली चान्नी पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी रविंद्र लांडे, पोह गजानन जायभाये, पोकॉ उमेश सांगळे सहभागी होते.

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**अकोला:** अकोला शहरातील बिर्ला राम मंदिर रेल्वे गेट परिसरात एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, याप्रकरणी सिव्हिल लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ५०३ / २०२५ अन्वये कलम ७४, ७८ (१) बीएनएस व पोक्सो कायदा कलम १२ अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी ३५ वर्षीय महिला रा. पंचशील नगर, खरप रोड, अकोला यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजताच्या सुमारास त्या व त्यांची मुलगी नेहमीप्रमाणे धुणी-भांडी कामासाठी जात असताना, बिर्ला राम मंदिर रेल्वे गेट परिसरात एका अज्ञात इसमाने त्यांच्या मुलीचा हात वाईट उद्देशाने पकडून तिचा विनयभंग केला. आरोपी अनोळखी असून, त्याचा शोध घेण्यासाठी सिव्हिल लाईन पोलिसांकडून तपास सुरू आहे. पुढील तपास सिव्हिल लाईन पोलिस स्टेशन करीत आहे.

### पातुर आठवडी बाजारात वरली मटका अड्डयावर पोलिसांची कारवाई

**पातुर :** शहरातील आठवडी बाजार परिसरात सुरू असलेल्या वरली मटका जुगारावर पातुर पोलिसांनी दि. २० डिसेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली. या कारवाईत दोन ठिकाणी छापे टाकून तीन जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आठवडी बाजारात दुपारच्या सुमारास टाकलेल्या धाडीत दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून वरली मटक्याचे साहित्य व १,९२० रुपये रोख जप्त करण्यात आले. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आगीखेड - पारडी रोडवरील जय भोले हॉटेल परिसरात केलेल्या दुसऱ्या कारवाईत एका आरोपीकडून वरली मटक्याचे साहित्य व १,४४० रुपये रोख जप्त करण्यात आले. दोन्ही प्रकरणांचा तपास सुरू आहे.

### कर्मयोगी गाडगेबाबांना अभिवादन

**मूर्तिजापूर :** गाडगेबाबा स्मारक समितीच्या वतीने संतोष नगर येथील नियोजित स्मारक आयोजित या अभिवादन कार्यक्रमात परीट समाजासह नागरिकांनी बाबांच्या विचारांना उजाळा दिला. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते बाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यातआले. यावेळी उपस्थितांनी गाडगेबाबांच्या स्वच्छता, शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन या त्रिसूत्रीचा पुन्हा एकदा संकल्प केला. या अभिवादन सोहळ्याला समाजातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने आमदार हरीश पिंपळे, राहुल तिडके, बाळासाहेब मोखडकर,मुकुंद नांदेकर, रितेश उंबरकार, मोहन टाले, अरुण सवाईकर, सुधीर शेवाणे, संभाजी वडूरकर, संतोष शहाकर, सुनील सोनोने, रितेश शेंदरकर, रूपेश चहाकर, अनिल प्रशांत चहाकर,डायलकर, सुनील डायलकर, बाळासाहेब धबाले यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### कौलखेड चौकात वाहतूक कोंडी!

**अकोला :** कौलखेड चौक व परिसरात रोजच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. अनियंत्रित वाहतूक, अरुंद रस्ते आणि वाढती वाहनसंख्या यामुळे ही समस्या गंभीर बनली आहे. कार्यालयीन वेळेत तसेच सायंकाळच्या सुमारास वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. आपत्कालीन वाहनांना मार्ग काढणे कठीण जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. वाहतूक पोलिसांची संख्या अपुरी असल्याने नियंत्रणावर मर्यादा येत आहेत.

### शहरातील कचरा व्यवस्थापन कोलमंडले

**अकोला :** शहरातील कचरा संकलन व विल्हेवाटीची यंत्रणा सध्या अपुरी ठरत असल्याचे चित्र आहे. अनेक भागांत कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने रस्त्यांच्या कडेला ढिगारे साचले आहेत. त्यामुळे दुर्गंधी पसरत असून माशा, डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता, वाहनांचा अभाव आणि नियोजनातील त्रुटी यामुळे समस्या अधिकच गंभीर झाली आहे. महापालिकेने कचरा संकलनासाठी कंत्राट दिले आहे. मात्र संबंधित कंपनीकडून कचरा संकलन योग्यरित्या होत नसल्याचे वास्तव आहे.

### अकोला मार्गे गोव्याला जाण्यासाठी विशेष ट्रेन

**अकोला :** थंडीत प्रवाशांची मागणी लक्षात घेत रेल्वे प्रशासनाने विलासपूर ते मडगाव तसेच बिलासपूर-वलसाड़ दरम्यान साप्ताहिक एक्स्प्रेस गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. बिलासपूर ते मडगाव विशेष साप्ताहिक एक्स्प्रेसच्या आठ फेऱ्या होणार आहेत. ही विशेष गाडी २० डिसेंबर ते १० जानेवारीपर्यंत प्रत्येक शनिवारी बिलासपूर येथून १४.४५ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी मडगाव येथे दुपारी २.१५ वाजता पोहोचेल. तसेच परतीच्या प्रवासात २२ डिसेंबर ते १२ जानेवारीपर्यंत प्रत्येक सोमवारी मडगाव येथून ५.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ४ वाजता बिलासपूर येथे पोहोचेल.

# मिराज सिनेमासमोरील रस्त्यावर वाहतूक कोंडी



**अकोला :** येथील मुर्तिजापूर रोडवरील मिरज सिनेमासमोरील रस्ता सतत जड वाहतुकीमुळे बंद असतो. चित्रपटगृहासमोरील मुख्य रस्त्यावर चित्रपट पाहणाऱ्यांच्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते, ज्यामुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठी गैरसोय होते. तथापि, वाहतूक पोलिस या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. भाजपाचे माजी महानगर अध्यक्ष अध्यक्ष पवन पडिया यांनी या समस्येवर त्वरित तोडगा काढण्याची मागणी केली आहे. मिराज सिनेमा कीर्ती नगरमधील टीव्हीएस शोरूमजवळ आहे. पूर्वी येथे राधा- कृष्ण सिनेमा होता. मिराज सिनेमा मल्टिप्लेक्स आहे, त्यामुळे मोठ्या संख्येने चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक येतात. आठवड्याच्या शेवटी, प्रेक्षकांची मोठी गर्दी असते. यातील काही प्रेक्षक त्यांची वाहने चित्रपटगृहासमोरील मुख्य रस्त्याच्या कडेला 'पार्क' करतात. त्यामुळे वाहनांची लांब रांग लागते. या मार्गावरील वाहतुकीवर प्रेक्षकांच्या वाहनांचा मोठा परिणाम होतो. या टॉकीजमधील चित्रपट संपल्यावर, प्रेक्षकांची मोठी गर्दी एकाचवेळी सिनेमा हॉलमधून बाहेर पडते, ज्यामुळे गेटवर वाहतूक कोंडी होते. मूर्तिजापूरहून अकोल्याकडे येणारी वाहने सिनेमा हॉलसमोरील वाहतूक कोंडीत अडकतात. संध्याकाळी वाहतूक कोंडी सर्वात जास्त असते.

# माटोडा विषमुक्त शेतीकडे अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी



■मुर्तिजापुर,दि २१ (प्रतिनिधी) :

मूर्तिजापूर तालुक्यातील माटोडा गावात राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गेल्या तीन वर्षांपासून सेंद्रीय व नैसर्गिक शेतीचा यशस्वी प्रयोग सुरू आहे. या उपक्रमामुळे गावात विषमुक्त शेतीची संकल्पना रुजत असून, इतर शेतकऱ्यांनाही या पद्धतीकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे. या पार्श्वभूमीवर आत्मा, अकोला प्रकल्प संचालक तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनचे अध्यक्ष डॉ. मुरली इंगळे, उपसंचालक प्रेमसिंग मारक आणि तालुका कृषी अधिकारी दीपक तावडे यांनी माटोडा गावास भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी प्रगतशील शेतकरी गजानन ढोकणे यांच्या शेतात नैसर्गिक पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या गांडूळखत, ड्रायक्रोडमा दसपर्णी अर्क, जीवामृत एस नाईन कल्चरच्या तसेचसहाय्याने काडी-कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मितीचे प्रात्यक्षिक अधिकाऱ्यांना दाखविण्यात आले. रासायनिक खतांऐवजी कमी खर्चात, पर्यावरणपूरक व आरोग्यदायी शेती कशी करता येते, याची माहिती यावेळी देण्यात आली. नैसर्गिक शेतीमुळे मातीची सुपीकता वाढते, उत्पादन खर्चात बचत होते आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न शाश्वत राहते, असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

# प्रशासन निवडणूक मोडवर; सर्व सुट्टया रद्द

■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अकोला महापालिका क्षेत्रात आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी तात्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि वेगवान पद्धतीने राबवण्यासाठी प्रशासनाने आता कडक पावले उचलली असून, महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द केल्या असून शनिवार व रविवार रोजी कार्यालय सुरू राहणार आहे. निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेत प्रशासनाने शहरात विविध ठिकाणी ६ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांची स्थापना केली आहे. या महत्त्वपूर्ण कामकाजासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. निवडणुकीचे गांभीर्य लक्षात घेता, ही सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण परिपत्रक काढून सर्व विभाग प्रमुख, सहायक आयुक्त आणि पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या चारही क्षेत्रीय कार्यालयांना तातडीचे निर्देश दिले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक कालावधीत शनिवार, रविवार आणि इतर सर्व शासकीय सुट्ट्यांच्या दिवशीही महापालिकेची कार्यालये पूर्णवेळ सुरू राहणार आहेत.

# वैराग्यमूर्ति संत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्त एकल महिलांना आधाराचा हात

वैराग्यमूर्ति संत गाडगे महाराज यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त अनुभव शिक्षा केंद्र व विवेकानंद युवा मंडळ, लाडेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. संत गाडगे महाराज यांच्या समता, सेवा व मानवतेच्या विचारांना अभिवादन करत या उपक्रमाअंतर्गत गरजू, एकल, विधवा व निराधार महिलांना साडी-चोळीचे वितरण करण्यात आले. कारंजा शहरातील कारंजा-मानोरा मार्गावरील पालावर वास्तव्यास असलेल्या महिलांना साडी-चोळीचे वाटप करून त्यांच्या जीवनात थोडा दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासोबतच धनज गणातील डोंगरगाव व लाडेगाव या गावांमधील एकल महिला, विधवा व निराधार महिलांना सन्मानपूर्वक साडी-चोळी देण्यात आली. सामाजिक व आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांना आधार देणे आणि त्यांच्या आत्मसन्मानाला बळ देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



या कार्यक्रमास महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष बंडू इंगोले, सांस संस्थेचे अध्यक्ष श्याम सवाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी संत गाडगे महाराज यांच्या कार्याचा उल्लेख करत समाजातील वंचित घटकांसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

संपूर्ण उपक्रमाचे आयोजन आशिष धोंगडे (अनुभव शिक्षा केंद्र, अमरावती-वाशिम समन्वयक) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार दादाराव पांडुरंग बहुटे (माजी सरपंच, पिंपळगाव) यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी प्रमोद साटोटे (सरपंच) उपस्थित होते.साडी-चोळी वितरणासाठी श्री गजानन क्लिनिक, कामरगाव येथील डॉ. गणेश ओव्हर यांच्या संकल्पनेतून आवश्यक साड्या उपलब्ध करून देण्यात आल्या. या सामाजिक उपक्रमामुळे लाभार्थी महिलांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले.

# शिवाजी शिक्षण संस्थेचे स्वीकृत सदस्य ठोकळ यांचा सत्कार

■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :

विदर्भात ख्यातनाम श्री शिवाजी शिक्षण संस्थेत कार्य करण्याची संधी मिळणे ही विजय ठोकळ यांच्या सेवाकार्याची पावती असल्याचे प्रतिपादन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे यांनी केले. शिवाजी शिक्षण संस्थेच्या स्वीकृत सदस्यपदी सेवाभावी विजय ठोकळ यांची




नियुक्ती झाल्याबद्दल इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात धोत्रे बोलत होते.एकीकडे विद्यार्थ्यांअभावी शाळा बंद पडत असताना शिवाजी विद्यालयच्या मुख्य शाखेत विद्यार्थी संख्या ७०० वरून १३०० वर नेण्याच्या कार्याची ही पावती असावी असे नमूद करून आपण अधिक गती ने विद्यार्थी सेवा कार्य करू असा आशावाद मुख्याध्यापक ठोकळ यांनी यावेळी व्यक्त केला. प्रारंभी ॲड. सुभाषसिंह ठाकूर, डॉ. सतीश उटांगळे, डॉ मालोकार आदींनी सत्कार मूर्ती व अतिथींचे स्वागत केले. रेडक्रॉसचे चेअरमन डॉ किशोर मालोकार यांनी प्रास्ताविक संचालन डॉ संदीप चव्हाण यांनी केले. यावेळी बाजार समितीचे संचालक चंदू खेडकर, हरिभाऊ काळे, प्रकाश गवळी, ॲड सुभाष मुंगी, झामरे, दिनेश तायडे, दीपक बिरकड, पेठे, दिनकर गायकवाड, डॉ. राजू देशपांडे, डॉ. नरेश गोंड, डॉ प्रवीण बोंडे, डॉ. सुनील जाधव उपस्थित होते.

( पान ३ वरुन)जनार्दन बोलताना दिसत आहेत तर अकोटच्या जनतेनी सूध्दा भाजपावर विर्श्वास दाखवत सौ मायाताई धूळे यांनी सूद्दा ३५०० मंताचे वर आघाडी घेत अपक्षाला मात देत विजय संपादन केलातर तेल्हारा येथे ही आमदार साहेबाची चानक्यनीतीने व कार्यकर्त्याच्या जिवापाड मेहनतीने बुथ प्रमूखाची जबाबदारी नेत्यांचे मार्गदर्शनात नगराध्यक्षपदी वैषालीताई पालीवाल याना तीकीट देऊन तेल्हारा जनतेनी भाजपाच्या सौ पालीवाल यांना विजयी केले सोबतच वीस पैकी तेरा भाजपाचे नगरसेवक पन निवडून देत हिवरखेड व तेल्हारा येथे एकहाती सत्ता दिल्याबद्दल जनतेचे भाजपाकडुन आभार मानन्यात येत आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ाेमला स्क्ेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# टी२० विश्वचषकासाठी संतुलित संघ निवड

७ फेब्रुवारी ते २८ मार्च या कालावधीत आपल्याच देशात टी २० सामन्यांची विश्वचषक स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी २० तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. श्रीलंका हा या विश्वचषकाचा सहयजमान असून पाकिस्तान संघाचे सर्व सामने श्रीलंकेत होणार आहेत. या विश्व चषक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज सूर्यकुमार यादव हा करेल तर अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल हा या संघाचा उपकर्णधार आहे. शुभमन गिल हा भारताचा सलामीवर या स्पर्धेत भारतीय संघाचा सदस्य नसेल कारण गेल्या काही टी २० सामन्यात त्याची फलंदाजी ढेपाळली असल्याने त्याला निवड समितीने संघातून वगळले आहे. त्यामुळे या भारतीय संघाच्या डावाची सुरुवात यष्टिरक्षक संजू सॅमसन व युवा अभिषेक शर्मा हे करतील. संजू अनुभवी तर अभिषेक युवा खेळाडू आहे. संजू आणि अभिषेक हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची धडाकेबाज सुरवात करतील यात शंका नाही. संजू हा आश्वासक फलंदाज असून अभिषेक हा धडाकेबाज फलंदाज आहे. सध्या टी २० प्रकारात तो जगातील सर्वात घातक फलंदाज असून आपल्या धडाकेबाज फलंदाजीने तो प्रतिस्पर्धी गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवतो. संजू आणि अभिषेक यापिकी एक जरी फलंदाज किमान १० षटके टिकला तरी भारताचा विजय पक्का होतो. संजू आणि अभिषेक यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून ईशान किशन याची निवड करण्यात आलेली आहे. ईशान किशन हा संजू सॅमसनचा बॅकअप यष्टिरक्षही आहे. तिलक वर्मा हा तिसऱ्या क्रमांकावर खेळेल. तिलक वर्मा हा सध्या भारतीय संघातील सर्वात भरवशाचा खेळाडू असून फॉर्मात आहे. त्याने सातत्यपूर्ण खेळ करून भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. मधल्या फळीची जबाबदारी कर्णधार सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि रिंकू सिंग यांच्यावर आहे. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. टी २० सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही टी २० सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. स्थानिक क्रिकेट असो की आयपीएल किंवा आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट या तिघांची कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली आहे त्यामुळे त्यांच्या निवडीवर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. त्यांची निवड भारतासाठी सुचिन्ह आहे. त्यांनी जर चांगली सुरुवात केली तर भारताचे निम्मे काम फत्ते होईल. टी २० सामन्यात धडाकेबाज सुरुवात होणे महत्वाची आहे आणि हे तिघेही धडाकेबाज खेळीसाठी प्रसिद्ध आहे. चौथ्या क्रमांकावर भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव येईल तो भारताचा भरवशाचा फलंदाज असून मैदानातील सर्व दिशेला चेंडू मारण्याची त्याची खासियत आहे. सध्या त्याची बॅट रुसली असली तरी कोणत्याही क्षणी तो फॉर्मात येऊ शकतो. रिंकू सिंग हा आणखी एका धडाकेबाज फलंदाजाला निवड समितीने संधी दिली असून मिळालेल्या संधीचे तो ही सोने करेल यात शंका नाही. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. शिवम दुबे हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. मध्यमगती गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी अक्षर पटेल सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि ऑफ स्पिनर वरुण चक्रवर्ती यांना संधी मिळाली आहे. कुलदीप आणि अक्षर दोघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत मात्र त्यांच्यात विविधता आहे. अक्षर पटेल अर्थोडॉक्स स्पिनर आहे तर कुलदीप चायनमन गोलंदाज आहे त्यामुळे जरी ते डावखुरे असले तरी त्यांच्यात विविधता आहे. आणि दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहे अक्षर पटेल हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. वॉशिंग्टन सुंदर या आणखी एका अष्टपैलू खेळाडूची निवड समितीने निवड केली आहे तो ऑफस्पिन गोलंदाजी आणि फलंदाजीही करतो. वरुण चक्रवर्ती हा मिस्ट्री गोलंदाज भारतीय संघात आहे. त्याची लेगस्पिन भल्या भल्या फलंदाजाला बुचकळ्यात टाकते. तो जबरदस्त फॉर्मात आहे. भारताला चॅम्पियन ट्रॉफी आणि आशिया चषक जिंकून देण्यात त्याचे मोलाचे योगदान होते. आताही त्याने तसेच योगदान दिले तर भारत टी २० विश्वचषकावर पुन्हा एकदा नाव कोरू शकतो. जसप्रीत बुमराह व अर्शदीप सिंग या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत हर्षित राणा या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने अर्शदीप सिंग या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर दोन वर्षापूर्वी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. शुभमन गिल, श्रेयस अय्यर यशस्वी जयस्वाल, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज या अनुभवी खेळाडूंची निवड न झाल्याचे दुःखही आहे मात्र निवड समिती फक्त पंधरा सदस्यांचा संघ निवडू शकते त्यामुळे इच्छा असूनही निवड समितीला या खेळाडूंना या संघात निवडता आले नसेल मात्र भविष्यात त्यांना नक्की संधी मिळेल त्यामुळे त्यांनी नाउमेद होऊ नये. टी २० विश्वचषकासाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. या १५ खेळाडूंनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून टी २० विश्वचषकावर पुन्हा भारताचे कोरावे. टी २० विश्वचषकावर भारताचे नाव कोरण्यासाठी हे खेळाडू जीवाचे रान करतील आणि १४५ कोटी भारतीयांना टी २० विश्वचषक जिंकून देतील यात शंका नाही. तसे झाले तर इतिहास घडेल कारण भारताने याआधी दोनदा टी २० विश्वचषकावर नाव कोरले आहे आता जर भारताने पुन्हा हा विश्वचषक जिंकला तर तीनदा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल. यासह सलग दुसऱ्यांदा आणि टी २० विश्वचषक जिंकणारा पहिला यजमान देश ठरण्याचा बहुमानही भारताला मिळेल. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. टी २० सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा भारतात होणार आहे. घरच्या खेळपट्टीवर खेळण्याचा फायदा भारतीय संघाला नक्की मिळेल यात शंका नाही त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला पुन्हा एकदा टी २० विश्वचषक जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**




## श्रीनिवास रामानुजन-गणित संशोधनाला कलाटणी देणारे महान गणितज्ञ

भारतीय गणितज्ञ आर्यभट्ट यांनी शून्याचा आविष्कार केल्यानंतर ब्रह्मगुप्तांनी शून्याला एक संख्या म्हणून गणनेत वापरण्याची पद्धत विकसित केली. त्यानंतर जगातील उर्वरित संख्यांचे मूल्यमापन वाढले आणि गणिताला नवी दिशा मिळाली. पुढे गणिताचा हा भारतीय दृष्टिकोन महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या माध्यमातून जगभर परावर्तित झाला. महान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय गणित दिवस साजरा केला जातो. संपूर्ण भारतासाठी राष्ट्रीय गणित दिनाचे विशेष महत्त्व आहे. देशभरात गणित दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे मानवतेच्या विकासासाठी गणिताचे महत्त्व लोकांना पटवून सांगणे हा आहे. या दिवशी गणिताचे शिक्षक व विद्यार्थ्यांना शिबिर व इतर मंचाद्वारे उद्बोधन केले जाते. यासोबतच गणितातील जागतिक संशोधनावर चर्चासत्र आयोजित केले जातात.



२२ डिसेंबर २०१२ रोजी, भारताचे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, महान गणितज्ञ श्रीनिवास अय्यंगार रामानुजन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त चेन्नई येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना आदरांजली वाहत होते. त्यावेळी मनमोहन सिंग यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा वाढदिवस २२ डिसेंबर राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी २२ डिसेंबर रोजी देशभरात राष्ट्रीय गणित दिवस साजरा केला जातो. नॅशनल ऑकॅडमी ऑफ सायन्स, इंडिया ही अलाहाबाद येथे असलेली सर्वात जुनी विज्ञान अकादमी दरवर्षी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त एक विशेष कार्यशाळेचे आयोजन करत असते ज्यात जगभरातील गणितज्ञ सहभागी होत असतात.

श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी चेन्नई पासून ४०० किमी अंतरावर असलेल्या इरोड येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची गणित विषयातील प्रतिभा अतुलनीय होती. गणितातील कोणत्याही औपचारिक शिक्षणाशिवाय वयाच्या १२ व्या वर्षी ते त्रिकोणमितीमध्ये तर वयाच्या १५ व्या वर्षी अप्लाइड मॅथ मध्ये पारंगत झाले. १९०४ मध्ये त्यांना गणितातील विशेष योगदानाबद्दल रंगनाथ राव स्मृती पुरस्कार मिळाला. त्यांचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. ते मित्रांकडून पुस्तके उसने घेऊन वाचत असत. गणितात प्रतिभासंपन्न असल्यामुळे ते आपल्या पेक्षा मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांची शिकवणी घेत असत. त्यांनी आर्थिक गरजांसाठी मद्रास ट्रस्ट पोर्टच्या कार्यालयात कारकून म्हणून काम केले. नोकरीच्या काळात ते फावल्या वेळात गणिताचे प्रश्न सोडवत असत. कार्यालयात एकदा एका इंग्रजाने त्यांनी सोडविलेले अनेक क्लिष्ट गणिते पाहिली व ते खूप प्रभावित झाले. त्यांनी रामानुजन यांना ऑक्सफर्ड विद्यापीठात शिक्षणासाठी व संशोधनासाठी पाठवले. येथे त्यांची प्रोफेसर हार्डी यांच्यासोबत ओळख झाली. पुढे दोघांनी गणितात भरीव संशोधन केले व नावलौकिक मिळविला. रामानुजन यांच्या संशोधनाने प्रभावित होऊन लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना १९१८ मध्ये फेलोशिप दिली. हा सन्मान मिळविणारे रामानुजन हे आशियातील पहिले व्यक्ती होते. संख्या सिद्धांतावरील त्यांच्या अद्भूत कार्यामुळे त्यांना 'संख्यांचा जादूगार' म्हटले गेले. त्यांनी जगाला जवळपास ३५०० गणिताची सूत्रे दिली. ही सूत्रे इतर गणितज्ञ अजूनही पूर्णपणे सिध्द करु शकलेले नाहीत. १७२९ ह्या नंबरला रामानुजन नंबर असे म्हटले जाते. तसेच त्यांनी रामानुजन चौकोनाची संकल्पना मांडली ज्यातील आकडेमोड सर्वांना चकित करणारी आहे.

श्रीनिवास रामानुजन हे केवळ गणितज्ञ नव्हते, ते गणिताची ऊर्जा, गणिताचा आत्मा, गणितातील चमत्कार होते. त्यांनी हे सिद्ध केले की असामान्य प्रतिभेला पार्श्वभूमीची गरज नसते, गरज असते ती अतूट जिद्द आणि आवडीची. यकृताचा आजार बळावल्यावर पुढे ते भारतात परतले व दीर्घ आजाराने वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. अशा या महान गणितज्ञाला आज त्यांच्या वाढदिवशी मानाचा मुजरा.



**सुमेध रामचंद्र वानरे**
**(शिक्षक)**
एम.एस्सी. (गणित)
एम.एड्.
नॅशनल मिलिटरी, स्कूल,
अकोला
मो. ९१३००२१३८७

## भविष्यात पैशाचे महत्त्व शुन्य नि काम ऐच्छिक ठरेल



आर्टिफिशियल इंटेलिजेन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आजच्या काळातील सर्वात परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक आहे. हे आपले जीवन, कार्यपद्धती आणि संवाद साधण्याची पद्धत बदलत आहे. एआय हे एकप्रकारे मशीनच्या रुपात मानवाप्रमाणे समस्या सोडवणे, निर्णय क्षमता, तर्कसंगतता व नवीन गोष्टी शिकण्याचे काम करते.

आर्टिफिशियल इंटेलिजेन्सची संकल्पना प्राचीन काळापासूनची असून यात अनेक कथांचा देखील समावेश आहे. एआयचा औपचारिक अभ्यास हा २० व्या शतकात सुरु झाला. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी सर्वात प्रथम डार्टमाउथ कॉन्फरन्समध्ये आर्टिफिशियल इंटेलिजेन्स ही संकल्पना वापरली. येथूनच एआयच्या अभ्यासाला सुरुवात झाली. एआयच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५० मध्ये लन ट्युरिंग यांनी केलेली ट्युरिंग चाचणी. ही चाचणी मशीनची बुद्धिमत्ता क्षमता ही मानवी वर्तनाच्या तुलनेत वेगळी नसते हे स्पष्ट करते. येथूनच, भविष्यातील एआय संशोधन आणि विकासाचा पाया घातला गेला.

रोबोटिक्सचे भविष्य खूप महत्त्वाचे आहे, कारण ते मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित बनवेल. रोबोट्स आता केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाहीत, तर ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अधिक स्वायत्तपणे विचार करतील, शिकतील आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेतील. यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन आणि वाहतूक यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. रोबोट ही अशी साधने आहेत जी स्वायत्तपणे जाणू शकतात, तर्क करू शकतात, योजना करू शकतात आणि कृती करू शकतात. स्वतंत्रपणे कामे करण्यासोबतच ते मानवी क्षमता वाढवू शकतात आणि मानवी कृतींची नक्कल करू शकतात.

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणा-या रोबोटिक्स बाजारपेठांपैकी एक आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या आकडेवारीनुसार २०२१ ते २०२४ पर्यंत भारतात रोबोट स्थापनेत सुमारे ८४ टक्के वाढ झाली. वार्षिक औद्योगिक-रोबोट स्थापनेच्या बाबतीत भारत आता जगातील सहाव्या क्रमांकाचा देश आहे. २०२५ मध्ये रोबोटिक्सचे भविष्य हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण या क्षेत्राने सिद्धांताच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अवलंबनात प्रवेश केला आहे.

एआयच्या विस्तारामुळे एकीकडे नोक-यांवर टांगती तलवार उपस्थित झाली आहे. तर दुसरीकडे एआयच्या वाढत्या जाळ्यामुळे भविष्यात नोकरी गरजेपेक्षा छंद म्हणून केली जाईल. लोकं फक्त आवड म्हणून नोकरी करतील. हा बदल समाजाच्या रचनेत मूलभूतपणे बदल करेल आणि लोकांच्या भूमिका पूर्णपणे बदलेल. या बाबतीत जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती इलॉन मस्क यांनी धक्कादायक भविष्यवाणी करत एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सद्वारे पूर्णपणे बदललेल्या भविष्यातील जगाचे व्यापक दृष्टिकोन सादर केले.

पुढच्या १०-२० वर्षात एआय आणि रोबोटिक्स इतके प्रगत होतील की जगातील बहुतेक कामं ही मशीन्स करतील. लोकं इच्छा असेल तरच काम करतील. जेव्हा मशीनच सर्व गरजा विनामूल्य किंवा अतिशय स्वस्तात पूर्ण करू लागतील, तेव्हा सध्याची चलनव्यवस्था आणि पैशाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होईल. तुमच्या खिशातला पैसा, नोटा आणि बँक कार्ड्स भविष्यात कदाचित काहीही कामाचे राहणार नाहीत. एआय आणि रोबोटिक्स झपाट्याने विकसित झाल्यास 'पैसा' हे फक्त औपचारिक साधन राहील. कारण एआय आणि रोबोटिक्स इतक्या वेगाने प्रगत होतील की, उत्पादनासाठी मानवशक्ती किंवा मोठ्या संसाधनांची गरजच उरणार नाही. वस्तूंची मुबलकता वाढली तर 'पैसा' या संकल्पनेची किंमत उरेलच असे नाही.

भविष्यात ऊर्जा हीच खरी करंसी ठरू शकते. ऊर्जा ही उत्पादनाची मूळ ताकद असल्याने तिचे महत्त्व पैशापेक्षा जास्त होईल. इलॉन मस्क यांनी स्कॉटिश लेखक इयान बँक यांच्या 'कल्चर' सीरिजचा दाखला देत एका अशा समाजाचे वर्णन केले आहे की, जिथे काहीच कमी नसते आणि पैसा अस्तित्वातही राहत नाही. सोलर पावर्ड एआय आणि स्पेसमधून ऊर्जा मिळवणा-या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अशी दुनिया वास्तवात उतरण्याची शक्यता व्यक्त केली.

जग जसं पुढे चाललं आहे, तसं जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात 'पैसा' नाहीसा होईल. नोक-या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच ख-या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणा-या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोकं कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील.

टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. या प्रणाली विकसित होताना मानवी जीवनातील आर्थिक संघर्ष पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मानवांना काम करायचे की नाही हे निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा रोबोट सर्व कामं हाती घेतील तेव्हा सरकारला युनिव्हर्सल हाय इन्कम प्रदान करावे लागेल, जे साध्या मूलभूत उत्पन्नापेक्षा खूप जास्त असेल. येत्या काळात हा बदल अधिकाधिक स्पष्ट होईल.

**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

### भक्ती, शक्ती आणि राष्ट्रप्रेम जागवणारा महोत्सव...

सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन आणि सनातन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सनातन राष्ट्र शंखनाद हा भव्य कार्यक्रम ऑनलाइन माध्यमातून पाहण्याचा योग आला. देशभरातून उपस्थित असलेले साधू-संत, राष्ट्रनिष्ठ, विचारवंत आणि शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रांचे दर्शन यामुळे या महोत्सव अत्यंत विलक्षण ठरला. हा महोत्सव म्हणजे केवळ कार्यक्रम नसून भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम असल्याचे प्रकर्षाने जाणवत होते.

आज देशासमोरील घुसखोरी, अर्बन नक्षलवाद, लव जिहाद, हलाल जिहाद, जनसंख्या जिहाद, डीप स्टेट, मंदिरांचे सरकारीकरण, सांस्कृतिक दहशतवाद तसेच वैचारिक दहशतवाद यांसारख्या ज्वलंत विषयांवर नामवंत विचारवंतांचे अभ्यासपूर्ण उद्बोधन ऐकायला मिळाले. विचारवंतांच्या सखोल अभ्यासातून आज सनातन राष्ट्राची आवश्यकता का आहे याचे महत्त्व लक्षात आले.

वसुधैव कुटुंबकम् या व्यापक तत्त्वावर आधारलेली आपली सनातन संस्कृती ही मानवतेचा मार्ग दाखवणारी आहे. तिचे पुनरुज्जीवन होणे ही काळाची गरज असून, हा महोत्सव म्हणजे त्या दिशेने उचललेले पाऊल आहे, हे देखील स्पष्टपणे दिसून आले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून निर्माण झालेली राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रप्रेमाची ज्योत अखंड तेवत राहो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना! असा प्रेरणादायी महोत्सव प्रत्येक राज्यात आयोजित व्हावा, ही आयोजकांना नम्र विनंती आणि पुनश्च महोत्सवाच्या आयोजकांचे मनःपूर्वक धन्यवाद!

**सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा**

**वाचक लिहितात**

### डिजिटल क्रांतीच्या युगात

लोकांचा त्रास,वेळ आणि पैसा वाचवण्यासाठी सरकारने सर्व व्यवहार डिजिटल अर्थात ऑनलाइन करण्याचे सुचविले आहे पण प्रशिक्षणाचा अभाव आणि नवीन न स्वीकारण्याची मनोवृत्तीमुळे अश्या व्यवहारांमध्ये येणाऱ्या अडचणींमुळे शंभर टक्के सर्व व्यवहार हे ऑनलाइन किंवा डिजिटल माध्यमातून होत नाही. अधिकारी आणि कर्मचारी यांच्या म्हणण्यानुसार सरकारची धरसोड वृत्ती कामात अनेक अडथळे निर्माण करते . एक प्रणाली विकसित करून त्याचे प्रशिक्षण घेऊन प्रशिक्षित होईपर्यंत कोणाचे तरी हितसंबंध जपण्यासाठी नवीन प्रणाली आणली जाते. ही प्रणाली बहुतेक वेळा परिपूर्ण नसल्याने त्यात अनेक अडचणी येतात त्यामुळे डिजिटल कामे करण्यास अधिकारी कर्मचारी उत्सुक नसता. त्यामुळेच शतप्रतिशत व्यवहार डिजिटल होत नाही. या संधीचा फायदा फसवणूक करणारे लोक घेतात आणि परिपूर्ण अशी प्रणाली वापरून लोकांची फसगत केली जाते.

याचे एक नवीन उदाहरण म्हणजे नोव्हेंबर महिन्यात निवृत्तीवेतनधारकांना हयातीचा दाखला द्यावा लागतो. त्यासाठी सरकारने जीवन प्रमाणपत्र हे प अस्तित्वात आणले आहे आणि यावरून तुम्ही आपले जीवन प्रमाणपत्र पाठवू शकता ह्यामुळे वेळ आणि पैसाही वाचतो असे सांगण्यात आल्यामुळे अनेकांनी ह्या पचा उपयोग करून आपला हयातीचा दाखला संबंधित यंत्रणेला सादर केला पण प्रणालीच्या सदोषत्वामुळे म्हणा किंवा अन्य काही कारणामुळे म्हणा अनेक जणांचे दाखले संबंधित यंत्रणेकडे गेले नसल्याने त्यांना पुढील महिन्यात निवृत्तीवेतन मिळेल की नाही ही शंका निर्माण झाली आहे. बऱ्याच यंत्रणेकडून निवृत्ती धारकांना अश्या प्रकारचा फोन किंवा मेसेज पाठवले गेले आहेत. फोन किंवा मेसेज उशीरा मिळाल्यामुळे हयातीचा दाखला देण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांना धावपळ करावी लागत आहे. व्यवस्थेत पारदर्शकपणा आणि परिपूर्ण यंत्रणे साठी सर्व अधिकारी, कर्मचारी प्रामाणिक आणि सुसंस्कृत असतील तरच हे शक्य होऊ शकतं. लोकांची फसवणूक करणारे अद्यावत प्रणाली निर्माण करून त्याद्वारे लोकांची फसवणूक करत आहे. जर फसवणूक करणारे अत्याधुनिक प्रणाली वापरत असेल तर सरकारने त्याच्यापुढे दोन पावले जाऊन आती आधुनिक प्रणाली विकसित करणे गरजेचे आहे. जर आपण संस्कारीत असू, ज्ञानाने परिपूर्ण असू तर आपल्या हातून निश्चितच चांगले राष्ट्र आणि धर्मकार्य होऊ शकते. विज्ञान आणि तंत्रज्ञान या गोष्टी रोज अद्यावत ठेवल्यानेच आपण प्रगती करू शकतो हे लक्षात ठेवून त्याप्रमाणे सरकार आणि लोकांनी तशी पावले उचलली पाहिजे. येणाऱ्या काळात आपल्या सर्व यंत्रणा या परिपूर्ण आणि अद्यावत असायला पाहिजे. राम राज्यात सुप्रशासन होते आणि आता आपल्याला परत रामराज्य आणायचे असल्यास सर्व व्यवस्थेत सुप्रशासन निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे


**लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल**

### मुलांवर आभासी पात्र रंगवू नका !

व्या शतकात एकीकडे विज्ञानवाद जोपासला जात असताना दुसरीकडे मात्र काही जुनाट प्रथांना, काल्पनिक पात्रांना आजही गोंजारले जात आहे याचे आश्चर्य वाटते. महासत्ता असलेल्या आणि महासत्ता बनू पाहणारे देशही यातून सुटलेले नाहीत. ख्रिसमसच्या दिवशी रात्री वाजता येणारा आणि मुलांना खेळणी देऊन जाणारा सांताक्लॉज बाबा हे त्यातलेच एक काल्पनिक पात्र. सर्व गोष्टी विज्ञानाच्या तराजूत मोजणारी विज्ञानवादी, पुरोगामी मंडळी या बाबाचे वास्तव शोधण्याचा प्रयत्न करताना कधी दिसत नाहीत. ख्रिस्तीबहुल देशांमध्ये या सांताक्लॉज बाबाचे स्तोम माजणे एकवेळ मान्यही आहे मात्र भारतासारखा हिंदुबहुल देश ज्याला प्राचीन आणि महान अशी वास्तववादी हिंदू संस्कृती लाभली आहे, अशा देशात या काल्पनिक पात्राचा शिरकाव मनाला खटकणारा आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक आपल्या मुलांना कॉन्व्हेन्ट शाळांमध्ये शिकवू लागली आहेत. याच कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना सांताक्लॉज बाबाच्या लाल टोप्या घालण्याची सक्ती केली जाते. ख्रिसमसच्या रात्री मुले झोपल्यावर मुलांच्या उशाजवळ खेळणी ठेवण्यास सांगितले जाते आणि ही खेळणी सांताक्लॉज बाबाने रात्री येऊन ठेवली असल्याचे मुलांना सांगण्यास सांगितले जाते. मुलांच्या कोवळ्या मनावर असे खोटे आभासी पात्र रंगवणे कितपत योग्य आहे ?

**ज्योती रावराणे,**
**कांजूरमार्ग**

# गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य



भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, ज्यांचे कार्य केवळ धार्मिक चौकटीत मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रवाहाला दिशा देणारे ठरते. अशाच महान विभूतींपैकी एक म्हणजे गुरु गोविंद सिंह होय. शीख धर्माचे दहावे गुरु म्हणून त्यांची ओळख असली, तरी त्यांचे कार्य हे केवळ धर्मगुरुपदापुरते सीमित नव्हते. ते एक समाजसुधारक, न्यायासाठी लढणारे योद्धा, मानवी मूल्यांचे तत्त्वज्ञ आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य देणारे नेतृत्व होते. त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याचा वेध घेणे म्हणजे भारतीय समाजातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या संघर्षाचा इतिहास समजून घेणे होय. गुरु गोविंद सिंह यांचा काळ हा सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अस्थैर्याचा होता. समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, धार्मिक असहिष्णुता आणि सत्ताधारी वर्गाच्या अन्यायाने ग्रासलेला होता. सामान्य माणूस भयभीत जीवन जगत होता. धर्माचा वापर माणसामाणसांतील भेद वाढवण्यासाठी केला जात होता. अशा परिस्थितीत गुरु गोविंद सिंह यांनी धर्माला सामाजिक न्यायाचे साधन बनवले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आणि मानवतेच्या रक्षणासाठी केलेली कृती होती.

गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे खालसा पंथची स्थापना. ही घटना केवळ धार्मिक नव्हती, तर ती सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. खालसा पंथाने जात, वर्ण, जन्माधारित श्रेष्ठत्व आणि सामाजिक भेदभाव यांना ठामपणे नाकारले. खालसा पंथात प्रवेश करताना सर्वांना समान ओळख देण्यात आली. सिंह आणि कौर ही नावे स्वीकारून स्त्री-पुरुषांना समान दर्जा देण्यात आला. या कृतीतून गुरु गोविंद सिंह यांनी स्पष्ट संदेश दिला की, मानवाची ओळख त्याच्या जन्मावर नाही, तर त्याच्या मूल्यांवर आणि कर्तृत्वावर आधारित असावी.

स्त्री-पुरुष समानतेचा विचार गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्या काळात स्त्रीला समाजात दुय्यम स्थान दिले जात होते. अनेक अमानवी प्रथा आणि रूढी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालत होत्या. गुरु गोविंद सिंह यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. खालसा पंथात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच सन्मान, अधिकार आणि जबाबदाऱ्या दिल्या. स्त्री ही दुर्बल नसून समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहे, असा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडला. त्यामुळेच शीख परंपरेत स्त्रीला आत्मसन्मानाचे स्थान मिळाले.

गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक विचारात आत्मसन्मान आणि स्वाभिमानाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांनी आपल्या अनुयायांना गुलामगिरीची मानसिकता झुगारून देण्याचा संदेश दिला. अन्याय सहन करणे हा धर्म नाही, तर अन्यायाला विरोध करणे हेच खरे धार्मिक कर्तव्य आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजवला. याच विचारातून संत-सिपाही ही संकल्पना पुढे आली. मनाने संत असावे, परंतु अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ते धैर्य आणि शक्ती अंगी असावी, असा त्यांचा आग्रह होता. ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नैतिक अधिष्ठान देणारी ठरली.

धार्मिक सहिष्णुता आणि मानवता हा गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा आत्मा होता. त्यांनी कोणत्याही एका धर्माला श्रेष्ठ मानले नाही, तर सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. त्यांच्या लिखाणातून आणि उपदेशातून मानवतेचे सर्वोच्च मूल्य सतत अधोरेखित होते. देवपूजेपेक्षा मानवसेवा श्रेष्ठ आहे, हा विचार त्यांनी समाजात दृढ केला. त्यामुळे शीख धर्म हा केवळ धार्मिक पंथ न राहता मानवी मूल्यांवर आधारित सामाजिक चळवळ बनला.

गुरु गोविंद सिंह यांनी शिक्षण आणि विवेकशीलतेलाही सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले. अंधश्रद्धा, रूढीवादी परंपरा आणि अज्ञान यांना त्यांनी समाजाच्या प्रगतीतील मोठे अडथळे मानले. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुयायांना ज्ञानसंपन्न, विचारशील आणि प्रश्न विचारणारे बनवण्यावर भर दिला. शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नव्हे, तर समाजाच्या नैतिक उन्नतीसाठी आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या विचारांमुळे समाजात विवेकवादी दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

त्यांच्या सामाजिक कार्यात सेवा आणि त्यागाला अनन्यसाधारण स्थान होते. गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण जीवनच त्यागाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या कुटुंबीयांचे, पुत्रांचे बलिदान दिले, तरीही अन्यायापुढे झुकण्यास नकार दिला. हे बलिदान केवळ धार्मिक नव्हते, तर ते मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मसन्मानासाठी होते. त्यांच्या या त्यागातून समाजाला धैर्य, निष्ठा आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा आदर्श मिळतो. आजही त्यांचे जीवन सांगते की, सत्य आणि न्यायासाठी दिलेले बलिदान कधीही व्यर्थ जात नाही.

गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य हे कालातीत आहे. आजच्या आधुनिक समाजातही जातीय भेदभाव, धार्मिक असहिष्णुता, स्त्री-पुरुष असमानता, सामाजिक अन्याय आणि शोषण विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा वेळी गुरु गोविंद सिंह यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. समता, बंधुता, न्याय आणि मानवतेवर आधारित समाजनिर्मितीचा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरतो.

वर्तमानपत्रात त्यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध होणारा लेख हा केवळ इतिहासाची उजळणी नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देणारा असतो. गुरु गोविंद सिंह यांनी दिलेला सामाजिक संदेश आपल्याला सांगतो की, धर्म हा माणसामाणसांमध्ये भिंती उभ्या करण्यासाठी नसून, त्या भिंती पाडण्यासाठी असावा. शक्ती ही दडपशाहीसाठी नव्हे, तर संरक्षणासाठी आणि न्यायासाठी वापरली जावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक मानव हा सन्मानास पात्र आहे.

२२ डिसेंबर रोजी आपण गुरु गोविंद सिंह यांची जयंती साजरी करताना आपण केवळ धार्मिक विधी आणि समारंभांपुरते मर्यादित न राहता, त्यांच्या सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करणे गरजेचे आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या बाजूने उभे राहणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे, जात-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेची कास धरणे, हाच त्यांच्या विचारांना खरे अभिवादन ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जर आपण न्याय, समता आणि बंधुतेसाठी सतत कार्यरत राहिलो, तरच गुरु गोविंद सिंह यांच्या विचारांचे खरे स्मरण आणि त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

# कॅलिडोस्कोप

## अंड्याची विक्रमी किंमत!

एका अंड्याची किंमत किती असू शकते? ७ रुपये, १० रुपये किंवा जास्तीत जास्त २५ रुपये; पण एका अंड्याची किंमत चक्क ३०.२ दशलक्ष डॉलर आहे. इतक्या पैशात शंभरहून अधिक हेलिकॉप्टर्स सहज खरेदी करता येतील.



एका अनोख्या लिलावात एका अंड्याने नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. ते प्रसिद्ध रशियन ज्वेलरी फॅबर्गे यांनी तयार केले होते आणि ते त्यांच्या कलात्मकतेचे एक अद्वितीय उदाहरण आहे. बर्फाच्या वितळणाऱ्या तुकड्यासारखे दिसणारे हे अंडे क्रिस्टलपासून बनलेले आहे. त्यावर सुमारे ४,५०० लहान हिरे जडवलेले आहेत. शिवाय, अंड्याच्या आत फुलांनी भरलेली टोपली ठेवली आहे. एकूणच, या 'क्रिस्टल फॅबर्गे एग'ची कारागिरी इतकी उत्कृष्ट आहे की ती लोकांना मोहित करते. या अंड्याचा इतिहास एखाद्या चित्रपटाच्या पटकथेपेक्षा कमी नाही. हे अंडे रशियाचे झार निकोलस द्वितीय यांनी १९१३ मध्ये ईस्टरला त्यांची आई, महाराणी मारिया फेडोरोव्हना यांना भेट म्हणून दिले होते. ते केवळ कलाकृती नव्हते, तर राजघराण्याच्या ऐश्वर्याचे प्रतीक होते.

ते रशियन क्रांतीमध्ये संपले. असे म्हटले जाते, की हे अंडे झारच्या राजवटीच्या समाप्तीनंतर गायब झाले होते, परंतु ते १९९० च्या दशकात पुन्हा दिसू लागले. तेव्हापासून, ते प्रत्येक वेळी विकले गेले आहे, यापूर्वीच्या सर्व लिलावांमध्ये या अंड्याने सर्व विक्रम मोडले आहेत. आता ३०.२ दशलक्ष डॉलर्सची बोली जिंकून या अंड्याने कला आणि इतिहास संपत्तीपेक्षा जास्त मौल्यवान आहेत हे सिद्ध केले आहे.

## तब्बल १६ मजली स्थानक !

भारतातील बहुतेक रेल्वे स्थानके एक किंवा दोन मजली आहेत, परंतु सध्या एक तब्बल१६ मजली स्थानक तयार होत आहे. हे रेल्वे स्थानक २०२७ पर्यंत पूर्ण होईल.

हे रेल्वे स्थानक अहमदाबादमध्ये बांधले जात आहे. देशातील सर्वात उंच आणि आधुनिक १६ मजली बहु-मॉडेल वाहतूक केंद्र म्हणून, हे रेल्वे स्थानक जुलै २०२७ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्याची उंची, डिझाइन आणि सुविधांमुळे या रेल्वे स्थानकाची चांगलीच चर्चा आहे. या १६ मजली हबमध्ये विस्तृत पार्किंग जागा, ऑफिस कॉम्प्लेक्स, व्यावसायिक क्षेत्रे आणि प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधांचा समावेश असेल.



नवीन स्थानकाची उंची, डिझाइन आणि सुविधांसह हे पूर्णपणे वेगळे आणि आधुनिक स्वरूपाचे असेल. हे केवळ एक रेल्वे स्थानकच नाही, तर प्रवासी, पर्यटक आणि शहरातील रहिवाशांसाठी एक बहुउद्देशीय सुविधा केंद्र असेल. रेल्वे, मेट्रो, बस आणि बुलेट ट्रेन सेवा एकाच प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित करण्यासाठी हे स्थानक डिझाइन केले जात आहे. प्रवाशांना एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व कनेक्टिव्हिटीचा आनंद घेता येईल. त्यामुळे प्रवास अत्यंत सोयीस्कर होईल.

या स्थानकाच्या डिझाइनमध्ये शहराच्या प्राचीन वारशाचा टच देण्यात आला आहे. बाह्य आणि अंतर्गत वास्तुकला वारशाचे सुंदर मिश्रण येथे पाहायला मिळेल. यात अहमदाबादची ऐतिहासिक ओळख जपली जाईल आणि आधुनिकतेचे मिश्रणही असेल. येत्या काळात वाढत्या प्रवाशांच्या वाहतुकीला लीलया हाताळण्यासाठी हे स्थानक डिझाइन केले जात आहे. शहराच्या विविध वाहतूक नेटवर्कशी थेट आणि अखंड कनेक्टिव्हिटी हे या प्रकल्पाचे प्रमुख आकर्षण आहे. रेल्वे अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार स्टेशनच्या आजूबाजूचा परिसरदेखील विकसित केला जाईल.

सुधारित रस्ते, बस कनेक्शन, मेट्रो लिंक आणि भविष्यातील बुलेट ट्रेन कॉरिडॉरमुळे, संपूर्ण परिसर अहमदाबादचे नवीन वाहतूक केंद्र म्हणून उदयास येईल. या प्रकल्पामुळे शहराचा आर्थिक विकास होऊन व्यापार आणि पर्यटनालाही चालना मिळेल.

## मंदिर उघडतं १२ तासांसाठी



भारतात अनेक मंदिरं आहेत. बऱ्याच मंदिरांमध्ये अनोख्या परंपरा पहायला मिळतात. काही मंदिरं वर्षातून एकदाच उघडतात. तर काही मंदिरांमध्ये वेगळ्या पद्धतीचा नैवेद्य दाखवला जातो. काही मंदिरं चित्रविचित्र नवस बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. छत्तीसगडमधल्या कोंडागाव जिल्ह्यात असंच एक मंदिर आहे. लिंगेश्वरी मातेचं हे मंदिर आहे. छत्तीसगडमध्ये या मंदिराचं मोठं महत्त्व आहे. पण इतर राज्यातल्या लोकांना याबाबत फारशी माहिती नाही. हे मंदिर वर्षातून फक्त एकदाच उघडतं आणि तेही फक्त बारा तासांसाठी.यावेळी इथे भाविकांनी मोठी गर्दी झालेली असते. छत्तीसगडमधला हा जिल्हा नक्षल प्रभावित आहे. त्यामुळे इतर भागातले लोक या ठिकाणी फारसे येत नाहीत. हिरव्यागार जंगलाच्या मधोमध अलोर नावाचं छोटंसं गाव आहे. या गावातल्या डोंगरांवर निसर्गाची एक कलाकृती पहायला मिळते. याच कलाकृतीच्या दारावर एक दगड आहे. हा दगड हटवल्यानंतरच मंदिरात प्रवेश करता येतो. या मंदिरात शंकर आणि पार्वतीच्या एकत्र रूपाला लिंगेश्वरी नावाने संबोधलं जातं. या मंदिरातल्या देवतेला काकडीचा नैवेद्य दाखवला की नवस पूर्ण होतो अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. त्यामुळे मंदिराच्या आसपास काकडी मोठ्या प्रमाणावर विकली जाते. लिंगेश्वरी देवतेला काकडी अर्पण केली की अपत्यप्राप्ती होते असंही मानलं जातं. फक्त एकच दिवस मंदिर उघडत असल्याने लोकं रांगत रांगत दर्शनासाठी जातात.

## ते प्लास्टिक खाणारे

प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत जनजागृती होत असते. अनेक ठिकाणी प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक वस्तूंवर बंदी येते. प्लास्टिकचं विघटन वर्षानुवर्षं होत नाही. त्यामुळे ते पर्यावरणाला हानिकारक असतं. पण आता एक किडा प्लास्टिक खाऊन पर्यावरणाचं रक्षण करू शकतो. मधमाशीचं पोळं खाणारा एक किटक प्लास्टिकही खाऊ शकतो असं केंब्रिज विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हा किटक मधमाशीचं पोळं पचवू शकतो. त्याचप्रमाणे तो प्लास्टिकही पचवू शकतो, असं संशोधनातून समोर आलं आहे. 'गॅलेरिया मेलोनेला' असं या किटकाचं नाव आहे. हा किटक एखाद्या अळीसारखा दिसतो. हा किडा तासाभरात प्लास्टिकची पिशवी खाऊ शकतो. केंब्रिज विद्यापीठातले डॉक्टर पाओलो बॉम्बेली या संशोधनाचे प्रमुख आहे.



हा किडा प्लास्टिक कसा खातो हे समजून घेणं गरजेचं आहे असं ते सांगतात. या किड्याचं तंत्र जाणून घेतलं तर प्लास्टिक नष्ट करण्याचं तंत्रज्ञान आपण निर्माण करू शकू. यामुळे प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाचं आव्हानाला सामोरं जाता येईल, असं त्यांचं म्हणणं आहे. या छोट्याशा किड्यांची प्लास्टिक खाण्याची क्षमता अनोखीच म्हटली पाहिजे.

## रंगीबेरंगी नदी



आकाशात इंद्रधनुष्याचे सुंदर रंग दिसतात. सरडा परिस्थितीनुसार रंग बदलतो. निसर्गात असे बरेच चमत्कार पहायला मिळतात. आजवर आपण विविध नद्यांबद्दल ऐकलं आहे. काही नद्या लुप्त झाल्या आहेत. तर काही अचानक प्रगट झाल्या आहेत. काही नद्यांनी आपले मार्गही बदलले आहेत. पण शेजारच्या फोटोत दिसणारी नदी अनेक अर्थांनी वेगळी आहे. 'कॅनो क्रिस्टल्स' असं या नदीचं नाव आहे. कोलंबिया नावाच्या देशात ही नदी आहे. ही नदी ऋतूनुसार आपला रंग बदलते. हो, हे खरं आहे. ही नदी १०० किलोमीटर लांब आहे. तर तिची रूंदी जवळपास २० मीटर आहे. या नदीला 'लिक्विड रेन्बो' असंही म्हटलं जातं. कधी या नदीच्या पाण्याचा रंग लाल असतो. तर कधी पिवळा होऊन जातो. कधी तो हिरवा झालेला असतो. ही नदी रंग का बरं बदलत असेल? या प्रश्नाचं उत्तर एका रोपट्यात दडलं आहे. या नदीत 'मॅकारेनिया क्वॅवीगॅरा' नावाचं रोपटं आढळतं. या रोपट्यामुळेच नदीचा रंग बदलत राहतो. या रोपट्याला पुरेसं पाणी किंवा सूर्यप्रकाश मिळाला तर त्याचा रंग गडद लाल किंवा सौम्य होतो. वर्षातला बराच काळ या नदीचा रंग फिका किंवा गडद गुलाबी वा फिका किंवा गडद लाल असतो. पण काही वेळा पाण्याचा रंग पिवळा, हिरवा, नारिंगी किंवा निळाही होतो. जून ते नोव्हेंबर या काळात ही नदी रंग बदलते. निसर्गाचा हा अद्भुत कलाविष्कार पाहण्यासाठी इथे पर्यटकांची झुंबड उडालेली असते. पण निसर्गाच्या रक्षणासाठी काही नियमही बनवण्यात आले आहेत. एका दिवसात २०० पेक्षा जास्त लोकांना या प्रदेशात जाता येत नाही.

## स्टेशनचे नाव की मारुतीचे शेपूट?

भारतात अनेक वैशिष्ट्यपूर्ण रेल्वे स्थानके आहेत. भव्यतः गर्दी, लांबी, रुंदी तसेच विविध कारणांमुळे ही रेल्वे स्थानके प्रसिद्ध झाली आहेत, तर काही रेल्वे स्थानके त्यांच्या इतिहासासाठी जगभरात प्रसिद्ध आहेत. भारतातील असेच एक रेल्वे स्थानक त्याच्या नावामुळे प्रसिद्ध आहे. सर्वात मोठ नाव असलेले भारतातील एकमेव रेल्वे स्टेशन आहे. या स्टेशनचे नाव वाचता वाचता ट्रेन निघून जाईल

भारतीय रेल्वे दररोज लाखो प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचवते. भारतीय रेल्वे हे जगातील चौथ्या क्रमाकांचे सर्वात मोठे रेल्वे नेटवर्क आहे. भारतातील जुन्या रेल्वे स्थानकांमध्ये प्रतीक्षा कक्षांचा विस्तार केला जात आहे आणि नवीन स्थानके बांधली जात आहेत. हा विस्तार केवळ जुन्या रेल्वे स्थानकांमध्येच नाही, तर त्यांच्या नावांमध्येही दिसून येतो. भारतातील एका रेल्वे स्थानकाच्या नावात एक किंवा दोन नाही, तर तब्बल २८ अक्षरे आहेत. काही स्थानकांना प्राण्यांची नावे दिली जातात, तर काहींची नावे व्यक्तींची नावे आहेत. भारतात अशा प्रकारच्या अद्वितीय नावांची




रेल्वे स्थानके भरपूर आहेत. या स्टेशनचे नाव 'वेंकटनरसिंहराजुवरीपेटा' असे आहे. तामिळनाडूच्या सीमेवर असलेल्या या स्टेशनला व्हीकेझेड कोड आहे. हे रेल्वे स्टेशन दक्षिण रेल्वेच्या अरक्कोनम शाखा मार्गावर आहे.

५७ अक्षरांचे नाव असलेले स्टेशन

जगात एक रेल्वे स्टेशन आहे ज्याच्या नावात ५७ अक्षरे आहेत. त्या स्टेशनला 'Llanfairpwll gwyngyllgogerych wyrndrobwllllantysili ogogogoch' असे म्हणतात. हे एक लहान, शांत गाव असून ते ब्रिटनमधील नॉर्थ वेल्समधील अँगलसी बेटावर आहे. या स्टेशनला सामान्यतः डश्ररपषरळीुश्रिश्र असेही म्हणतात.

## ...म्हणून इथे येतात चिनी नागरिक



एखाद्या देशात फिरायला गेल्यावर आपण तिथे वाहन चालवण्याचा परवाना मिळवण्यात वेळ घालवणार नाही. पण दक्षिण कोरियातल्या जेजू बेटांची गोष्टच निराळी आहे. जेजू हे बेट पर्यटकांसाठी जणू स्वर्गच आहे. निसर्गसौंदर्याने नटलेलं हे ठिकाण पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत आलं आहे. ज्वालामुखीच्या स्फोटातून या बेटाची निर्मिती झाली आहे. हे बेट कोरियाच्या दक्षिण-पश्चिम भागापासून १०० मैल अंतरावर आहे. जेजूमध्ये चीनी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. या वर्षी जवळपास ३ लाख चीनी पर्यटक जेजूमध्ये येऊन गेले आहेत. जेजूचे समुद्र किनारे चीनी पर्यटकांना खूप आवडतात. तसंच खरेदी आणि जुगार खेळण्यालाही त्यांची पसंती असते. यासोबत इथला वाहन चालवण्याचा परवाना मिळवण्यासाठीही ते उत्सुक असतात. इथल्या वाहन परवान्याची परीक्षा देण्यासाठी अनेक जण चीनमधून जेजूमध्ये येतात. एक अख्खा दिवस वाहन परवाना मिळवण्यासाठी घालवतात. हे लोक इथे येतात. फॉर्म भरतात. दिवसभर रांगेत उभे राहतात आणि परीक्षा देतात. या वर्षी २१७२ चीनी नागरिकांना वाहन चालवण्याचा परवाना देण्यात आला आहे. चीनमधल्या महानगरांमध्ये वाहन परवाना बनवून घेण्यासाठी प्रचंड खर्च येतो. त्यापेक्षा कमी खर्चात लोक जेजूला येऊ शकतात. तसंच इथे अगदी झटपट परवाना मिळून जातो. चीनमधल्या टूरिस्ट कंपन्या दक्षिण कोरियात परवाना बनवून घेण्यासाठी पाच दिवसांची टूर आयोजित करतात. यासाठी पॅकेजही ठरलेली आहेत. चीनमध्येही इतर देशांमधून मिळालेला वाहन परवाना वैध असतो. जेजूमधून परवाना घेऊन आलेल्या नागरिकांना चीनमध्ये फक्त लेखी परीक्षा द्यावी लागते. जेजूमध्ये यायला चीनी लोकांना व्हिसा लागत नाही. त्यामुळे परवाना बनवून घेण्यासाठी या बेटावर चीनी नागरिक मोठी गर्दी करतात.

## खातेधारकाचे अजब नाव

सरकारी बँकांत येणारे बरेच लोक फारसे शिक्षित नसतात. परिणामी, ते स्वतः बँकिंग कामे करू शकत नाहीत किंवा चुकीची माहिती भरतात. एका महिलेने स्टेट बँकेच्या डिपॉझिट स्लिपवर लिहीलेले पाहून बँक व्यवस्थापकालाही धक्का बसला. व्हायरल डिपॉझिट स्लिप पाहून 'सोशल मीडिया' वापरकर्ते हसू आवरू शकले नाहीत.

ही डिपॉझिट स्लिप अलीकडेच सोशल मीडियावर एका अकाउंटवरून शेअर करण्यात आली आहे आणि नेटिझन्स त्यावर विविध प्रकारे कमेंट करत आहेत. महिलेने भरलेल्या या डिपॉझिट फॉर्ममध्ये खातेधारकाच्या नावाऐवजी 'सोनूची आई' असे लिहिले आहे. दरम्यान,


CA/SB / RD / DL / TL
दिनांक/ Date 30-09-25
भारतीय स्टेट बैंक
STATE BANK OF INDIA
पूरा नाम/ Full Name सोनू की मम्मी
A/c No.
Details of Cash / Cheques | राशि/ AMOUNT
सोनू की पढ़ाई के लिये पैसा जमा करना है | कन्या
22000 | योग/ TOTAL राज योग

रक्कम आणि एकूण रक्कम वाचून प्रत्येकजण हसून हसून लोळत आहे. रोख/चेक स्टेटमेंटमध्ये महिलेने 'सोनूच्या शिक्षणासाठी पैसे जमा करावे लागतील.', असे लिहिले आहे. रकमेच्या कॉलममध्ये 'कन्या' लिहिले आहे. एकूण रकमेऐवजी, तिने 'राजयोग' लिहिले आहे. स्लिपमध्ये एकूण २२ हजार रुपये जमा असल्याचा उल्लेख आहे.

## काकडी तोडली, शिक्षा झाली

काकडीची चोरी करणं एका व्यक्तीला चांगलंच महागात पडलं आहे. काकडी चोरीच्या या आरोपीला ११ कोटी रूपयांचा दंड भरावा लागणार आहे. अमेरिकेतल्या एका न्यायालयाने ही शिक्षा सुनावली आहे. अर्थात ही साधीसुधी काकडी नव्हती तर समुद्री काकडी होती. एका कंपनीच्या मालकाने मोठ्या संख्येने या काकड्या काढल्या. सागरी संपत्ती गोळा करणारी त्याची कंपनी आहे. 'ओरिएंट सी फूड प्रोडक्शन्स' असं या कंपनीचं नाव आहे. या विचित्र घटनेला न्यायालयाने गांभीर्याने घेतलं. न्यायालयाने कंपनीला मालकाला तीन वर्षांची शिक्षा ठोठावली. इतकंच नाही तर अकरा कोटी रूपयांचा दंडही ठोठावला. पर्यावरण आणि समुद्री जीवनाचा विचार केला तर न्यायालयाचा निर्णय योग्य असल्याचं अमेरिकन नागरिकांचं म्हणणं आहे.



अमेरिकेत समुद्रातून काकडी काढणं बेकायदेशीर नाही. पण ही कृती करण्याआधी संबंधित प्रशासनाकडून परवानगी घेणं गरजेचं असतं. हून नामकुंग असं या कंपनीच्या मालकाचं नाव आहे. गरजेपेक्षा २० टक्के अधिक काकडी काढल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. २०१४ ते २०१६ या काळात हूनने समुद्रातून १,१३,४०० काकड्या काढल्या होत्या. यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता होती. समुद्री काकड्यांमुळे पाण्यातल्या क्षारांची संख्या संतुलित राहते. जास्त प्रमाणात काकड्या काढल्याने पाण्याचं संतुलन बिघडून समुद्री जीवन धोक्यात येऊ शकतं. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाचं सगळीकडून स्वागत होत आहे.

## 'इथे' हव्यात फक्त पांढऱ्या गाड्या

जगातील अनेक देश केवळ संस्कृती किंवा नैसर्गिक सौंदर्यासाठीच नव्हे, तर तिथल्या अनोख्या कायद्यांसाठीदेखील ओळखले जातात. प्रत्येक देशात नागरिकांना काही नियमांचे पालन करावे लागते, परंतु काही ठिकाणी नियम इतके वेगळे आहेत की ते ऐकून आश्चर्य वाटेल. एका देशातील रस्त्यांवर फक्त पांढऱ्या गाड्यांनाच परवानगी आहे.

या देशाची राजधानी पांढऱ्या संगमरवराचे शहर म्हणून ओळखली जाते. कारण येथील जवळजवळ प्रत्येक बांधकाम, इमारती, पदपथ, सरकारी कार्यालये सार्वजनिक जागांपर्यंत सगळे चमकदार पांढऱ्या संगमरवरापासून बनलेले आहे. या दगडांवर सूर्यप्रकाश पडतो तेव्हा संपूर्ण परिसर तेजस्वी दिसतो. दिवस असो वा संध्याकाळ, शहर तेजस्वी दिसते. या तेजस्वी देखाव्यामुळे ते जगातील सर्वात चैतन्यशील आणि अद्वितीय शहरांपैकी एक बनले आहे. पांढऱ्या संगमरवराच्या प्रचंड प्रमाणाने त्याची ओळख पूर्णपणे बदलली आहे. म्हणूनच या शहराने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये स्थान मिळवले आहे. २००० नंतर येथे मोठ्या प्रमाणात विकासकाम सुरू झाले. या पुनर्बांधणी मोहिमेत ५५० हून अधिक नवीन संगमरवरी इमारती बांधल्या गेल्या. या इमारतींमधून चालताना जणू संपूर्ण शहर एका विशिष्ट थीमभोवती बांधले गेले आहे, असे वाटते.

पांढरा दगड इतका तीव्रतेने चमकतो, की रहिवाशांना अनेकदा सनग्लासेस घालावे लागतात. मनोरंजक म्हणजे, ढगाळ हवामानदेखील चमक कमी करत नाही. हा अनोखा देश तुर्कमेनिस्तान आहे आणि त्याची राजधानी अश्गाबातमध्ये २०१८ मध्ये रस्त्यावर फक्त पांढऱ्या किंवा हलक्या रंगाच्या गाड्याच चालू शकतील, असा नियम लागू करण्यात आला होता. हा नियम तुर्कमेनिस्तानचे तत्कालीन राष्ट्रपती गुरबांगुली बर्दीमुहामेदोव्ह यांनी लागू केला होता. त्यांना पांढऱ्या रंगाची विशेष आवड होती. राष्ट्रपतींची ही वैयक्तिक पसंती हळूहळू शहरव्यापी नियम बनली आणि संपूर्ण राजधानीच्या देखाव्यावर त्याचा प्रभाव पडला.

कोणी काळी कार किंवा इतर कोणत्याही रंगाची कार खरेदी केली, तर ती चालवू शकत नाहीत. पोलिस ताबडतोब वाहन जप्त करतात आणि मालकाला मोठा दंड आकारतात. नियमांनुसार किंवा कायदेशीर औपचारिकता पूर्ण होईपर्यंत गाडी परत केली जात नाही. परिणामी, येथे फक्त पांढऱ्या आणि चांदीसारख्या हलक्या रंगांच्या गाड्या दिसतात. या नियमाने



शहर सुंदर बनवले आहे. या ठिकाणी रंगाचा नियम केवळ वाहनांपुरता मर्यादित नाही. शहराच्या डिझाइन, सजावट, सरकारी जाहिराती आणि सार्वजनिक कलेत समान पांढरे सौंदर्य आवश्यक आहे. अनेक देशांच्या वास्तुकलेत वेगवेगळ्या शैलींचे मिश्रण असले, तरी संपूर्ण अश्गाबात शहर एकाच थीमभोवती डिझाइन केले असल्याचे दिसते. त्याच्या सरकारी इमारती, मॉल, हॉटेल्स, उद्याने आणि त्यांच्या अंतर्गत सजावटीमध्येही पांढऱ्या रंगाला प्राधान्य दिले आहे.

या शहरातून फिरताना डोळ्यांना सर्वत्र पांढरा रंग दिसतो. म्हणूनच त्याचे सौंदर्य अद्वितीय वाटते. पर्यटक येथे केवळ भेट देण्यासाठीच नव्हे तर शहराच्या असाधारण वास्तुकला आणि अद्वितीय नियमांचे कौतुक करण्यासाठीदेखील येतात. तुर्कमेनिस्तानमधील हे पांढरे शहर जगाला दाखवून देते, की कायदे केवळ सुव्यवस्थेसाठी बनवले जात नाहीत. कधीकधी एखादा नियम त्या ठिकाणाची ओळख बनतो ....

# कामठीत फुलले कमळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

काँग्रेस, भाजप आणि बरीएम यांच्यात झालेल्या अटीतटीच्या तिरंगी लढतीत अखेर भाजपने निसटता विजय मिळवत कामठी नगरपालिका निवडणुकीत इतिहास घडवला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची ठरलेल्या या निवडणुकीत भाजपचा पहिल्यांदाच नगराध्यक्षपदावर विजय झाला असून कामठीच्या राजकारणात नवे पर्व सुरू झाले आहे.

भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार अजय अग्रवाल यांनी अवघ्या २६७ मतांच्या फरकाने विजय मिळवला. त्यांनी बरीएमचे उमेदवार अजय कदम यांचा पराभव केला. अजय अग्रवाल यांना १३,१९७ मते मिळाली, तर अजय कदम यांना ११,५६६ मते मिळाली. काँग्रेसचे उमेदवार शकूर नागानी यांना १३,०६८ मते मिळाली. तिन्ही प्रमुख पक्षांमध्ये शेवटच्या फेरीपर्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. मतमोजणीदरम्यान प्रत्येक फेरीत आघाडी बदलत असल्याने शहरात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शाहजहा सफाअत यांनीही आपले नशीब आजमावले होते. त्यांना ४८,८१४ मते मिळाल्याची नोंद आहे. एकूणच या निवडणुकीत बहुपक्षीय लढतीमुळे मतांचे विभाजन झाले आणि त्याचा थेट फायदा भाजपला झाला, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

कामठी नगरपालिका ही आतापर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला मानली जात होती. त्यामुळे भाजपचा हा विजय केवळ स्थानिक



राजकारणापुरता मर्यादित न राहता जिल्हा आणि विदर्भ पातळीवर महत्त्वाचा मानला जात आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या विजयाचे श्रेय संघटनेची ताकद, कार्यकर्त्यांचे परिश्रम आणि जनतेच्या विश्वासाला दिले आहे. कामठीच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध आहे. हा विजय जनतेच्या अपेक्षांचे प्रतीक आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

विजयानंतर भाजप कार्यकर्त्यांनी शहरात जल्लोष केला. फटाके फोडून आणि एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त करण्यात आला. दुसरीकडे, काँग्रेस आणि बरीएमकडून निकालाबाबत आत्मपरीक्षण करण्याचे संकेत देण्यात आले आहेत. कामठीतील हा निकाल आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी दिशादर्शक ठरणार असून, विदर्भातील राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# चंद्रपुरात विजय वडेट्टीवार ठरले 'किंगमेकर'

## ११ पैकी ७ नगरपरिषदांवर काँग्रेसचा झेंडा, भाजपच्या ५ आमदारांच्या बालेकिल्ल्याला भगदाड

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २१ :

राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या आजच्या निवडणूक निकालात अनेक मोठे फेरबदल दिसून आलेत. महायुतीच्या वावटळीत शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची पुरती वाताहात झाली असताना काँग्रेसने मात्र ३१ जागा जिंकत चमकदार कामगिरी केली आहे. विशेषतः विदर्भात काँग्रेसने जोरदार कामगिरी करत भाजपच्या बालेकिल्ल्यांना सुरुंग लावला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अखेर राज्यातील नगरपंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्यात. आज झालेल्या मतमोजणीत भाजप हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला असून, सत्ताधारी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत.



विरोधी बाकावरील महाविकास आघाडीतील काँग्रेस वगळता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा कोणताही करिश्मा या निवडणुकीत चालला नाही. त्यांना एक आकडी संख्येतच समाधान मानावे लागले. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ३१ जागा जिंकत महाविकास आघाडीतील आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आपल्या होम ग्राउंडवर म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यात भाजपला धूळ चारली आहे. त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील ११ पैकी ८ नगरपालिकांवर काँग्रेसचा झेंडा फडकावला आहे. येथे सत्ताधारी भाजप व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला प्रत्येकी १ जागेवर समाधान मानावे लागले आहे. एका जागेवर अपक्ष उमेदवाराने बाजी मारली आहे. काँग्रेसच्या या विजयामुळे विजय वडेट्टीवार यांची चंद्रपुरावरील पकड अधिक घट्ट झाली आहे. ब्रह्मपुरी नगरपरिषदेत काँग्रेसचा दणदणीत विजय झाला आहे. येथे पक्षाने नगराध्यक्षपदाचे उमेदवार योगेश मिसार यांच्यासह २३ पैकी तब्बल २१ नगरसेवक मोठ्या मतांनी विजयी झालेत. हा "विजय" सत्तेचा नव्हे, तर लोकविश्वासाचा, लोकशक्तीचा आणि काँग्रेसच्या विचारांचा आहे. ब्रम्हपुरीच्या विकासासाठी, न्याय, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक प्रगतीसाठी काँग्रेस सज्ज आहे. मी सर्व ब्रम्हपुरी करांचे आणि काँग्रेस कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो, असे विजय वडेट्टीवार यांनी या निकालावर भाष्य करताना म्हटले.

## टिमला पूर्ण श्रेय : फडणवीस



जनतेने आम्हाला पूर्णपणे समर्थन दिले. संपूर्ण निवडणुकीत मी सकारात्मक प्रचार केला. एकाही सभेत कुठल्याही पक्ष, नेत्यांच्या विरोधात बोललो नाही. केवळ विकासावर मतदारांना मते मागितली. आम्ही काय केले, पुढे काय करणार आहोत याची ब्ल्यू प्रिंट मतदारांसमोर ठेवली. विधानसभेचा मुद्दा याही निवडणुकीत वापरला. शेवटी मतदारांनी विकासाला प्राधान्य देत भाजपाला मोठ्या प्रमाणात विजय मिळवून दिला अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

## जनतेची विकासाला पावती : बावनकुळे



मतदारांनी पक्ष न पाहता विकास कामाला आपले मत दिल्याने नागपूर जिल्ह्यात चौर भाजयला यश मिळाले अशी प्रतिक्रिया पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. बहुतांश नगरपरिषद आणि नगर पंचायतचे निकाल जाहीर झाल्यानंतर आणि भाजपाची विजयाकडे जात असल्यानंतर पालकमंत्री बावनकुळे हे पत्रकारांशी बोलत होते. सरकार रात्रंदिवस काम करीत असून विकासाला चालना देत आहे. मतदारांनी गट, तट किंवा पक्ष न पाहता विकासाच्या दृष्टीने भाजपला कौल दिला. आपल्या भागाचा विकास करायचा असेल, तर केंद्राशिवाय राज्याला पर्याय नाही हे ओळखून मतदारांनी भाजपला मदत केली.

## टायगर अभी जिंदा है : विजय वडेट्टीवार



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सर्व कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणजे चंद्रपुरातील काँग्रेसचे यश आहे. कार्यकर्त्यांच्या अपार मेहनतीमुळे युतीची सत्ता असताना चंद्रपूरचा गड काँग्रेसने राखला आहे. भाजपाने ११ पैकी केवळ १ जागा जिंकली आहे. टायगर अभी जिंदा है असे अभिमानाने म्हणत त्यांनी जल्लोष केला. भाजप युतीकडे सत्ता आहे, पैसा आहे याचा वापर करीत ते निवडणूक जिंकलेही असतील पण आम्ही चंद्रपुरात त्यांचा थारा लागू दिला नाही.

## चंद्रपूरने विकासाला नाकारले : मुनगंटीवार



चंद्रपूर जिल्ह्यात इतका विकास करूनही दुर्दैवाने मतदारांनी विकासाला नाकारले असे सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. या निवडणुकीत पक्षाने मला काही विशेष जबाबदारी दिली नव्हती. २०११ च्या निवडणुकीत मतदारांनी आम्हाला कौल दिला होता. तरीही इतर ठिकाणी आम्हाला चांगल्यापैकी यश मिळाले त्यात आम्ही समाधानी आहोत. पक्ष नेतृत्व आणि गटबाजीला आम्ही खतपाणी घालत नाही.

## पवनी नगराध्यक्षपदी विजया नंदुरकर विराजमान

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २१ :



संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या पवनी नगरपरिषद निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. त्यात नगराध्यक्षपदाच्या अत्यंत चुरशीच्या लढतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) डॉक्टर विजया नंदुरकर यांनी विजय संपादन केला आहे. त्यांनी भाजप उमेदवार भावना भाजीपाले यांचा ५७८ मतांनी पराभव करत नगराध्यक्षपदाची खुर्ची खेचून आणली. या निवडणुकीत तिरंगी लढत पाहायला मिळाली. डॉ. विजया नंदुरकर यांनी पहिल्या क्रमांकाची मते घेत विजय मिळवला, तर भाजपच्या भावना भाजीपाले दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. शिवसेना (शिंदे गट) तिसऱ्या क्रमांकावर, तर काँग्रेसला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. विलास काटेखाये, दुर्गा हटवार, भास्कर उरकुडकर, भीमा बावनकर, सुरेश अवसारे, सारिका नांदरधने, त्रिभुवन दंडारे, शहजाद बेग, वर्षा बिलवने, गणेश मुंडले, निकिता मेश्राम, सोनू बावनकर, वंदना नंदागवळी. निवडणुकीत सत्ताधारी शिंदे गटाचे वैष्णवी हटवार, सोनू पंचभाई, नामदेव सरकार, ज्योती तेलमासरे हे ४ उमेदवार निवडून आले.

# सुधीर पांगुळ वर्धेचे नगराध्यक्ष



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २१ :

२०१४ नंतर वर्ध्यात प्रथमच काँग्रेस नेत्यांना गुलाल उधळण्याची संधी मिळाली आहे. गत पालिका निवडणुकीत अपक्ष उभे राहून काँग्रेसला तिसऱ्या क्रमांकावर टाकणारे बंडखोर व आता काँग्रेस तिकिटावर लढणारे सुधीर भाऊराव पांगुळ दणदणीत मते घेत वर्धेचे नगराध्यक्ष झाले.

पांगुळ जर निवडून आले नाही तर यापुढे आयुष्यात मतदान करणार नाही, अशी अनेकांची विश्वासदर्शक भूमिका. ती सत्यात उतरली आहे. त्यांना २१ हजारावर तर भाजपचे नीलेश किटे यांना १६ हजारावर मते पडली आहेत. प्रभागात पण समिश्र निकाल असून भाजपसाठी ईशारा ठरला आहे. पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांचा विश्वासू म्हणून तिकीट मिळालेले किटे यांचा पराभव भोयर गटासाठी धक्कादायी.

तर विरोधकांना आनंदाच्या उकळ्या फोडणारा. किटे यांची तिकीट पक्की झाली आणि भाजपमधील नाराजी जाहीर व्यक्त झाली. पण तिकीट एकालाच मिळणार म्हणून इतरांनी कामाला लागावे, अशी तंबी चंद्रशेखर बावनकुळे यांनी देऊन टाकली होती. पण पक्ष कार्यकर्त्यांनी ती मनावर मुळीच घेतली नाही, असा हा निकाल आहे.

दुसरीकडे भाजप नेत्यांनी किटे यांची उमेदवारी आली आणि त्याची दारोमदार पालकमंत्री डॉ. भोयर यांच्यावर टाकून दिली. तुम्ही आणि तुमचा उमेदवार, असे भोयर विरोधक काही भाजप नेत्यांचे वर्तन दिसत होते. पालकमंत्र्यांचा विश्वासू हा नगराध्यक्ष झाला तर, आपले पुढे काय, याच चिंतेत अनेक दिसले.

## गोंदिया जिल्ह्यात भाजपचा पराभव

# काँग्रेसचे पुनरागमन

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २१ :

गोंदिया जिल्ह्यात दोन नगरपालिका आणि दोन नगरपंचायत निवडणुकीच्या निकालात भारतीय जनता पक्षाचे जिल्ह्यात ३ आमदार असून सुद्धा भाजपला तीनही ठिकाणी पराभव पत्करावा लागला आहे. फक्त तिरोडा नगरपालिकेची जागा ही भाजपने कशीबशी जिंकलेली आहे. पालिका निवडणुकीपूर्वी करण्यात आलेले अनपेक्षित पक्षप्रवेश आणि नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार निवडीत करण्यात आलेली चूक ही भाजपच्या पथ्यावर पडलेली असून गोंदिया जिल्ह्यात भाजपला प्रतिष्ठेची केलेली गोंदिया नगरपालिका आणि गोरेगाव आणि सालेकसा नगरपंचायती लाजिरवाणा पराभव पत्करावा लागलेला आहे तर काँग्रेस पक्षाने या तिन्ही ठिकाणी आपले वर्चस्व पुन्हा दाखवत पुनरागमन केले आहे.

भाजपचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या अखत्यारीत असलेली गोंदिया नगरपालिकेत काँग्रेस पक्षाचे सचिन शेंडे यांनी भाजपचे कशिश जायस्वाल यांच्या मोठ्या फरकाने पराभव केलेला आहे. तर आमदार संजय पुराम यांच्या विधानसभेत असलेली साले कसा नगरपंचायतीत नगराध्यक्ष पदाकरिता सर्वसामान्य जागेवर आमदारांनी अनुसूचित जातीचे उमेदवार दिल्यामुळे जनतेने त्यांना पराभवाच्या दणका दिलेला आहे. सालेकसा नगरपंचायत नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे विजय पुंडे यांनी भाजपचे राजेंद्र बडोले यांचा पराभव केलेला आहे. भाजपचे आमदार विजय रहांगडाले यांच्या विधानसभा क्षेत्रातील अनुसूचित जमाती करिता राखीव असलेल्या गोरेगाव नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे तेजराम बिसने यांनी ऐन पालिका निवडणुकीच्या पूर्वी भाजप पक्षात प्रवेश केलेले अजय कोठेवार यांच्या मोठ्या फरकाने पराभव केलेला आहे.

# गडचिरोलीत भाजपने गड राखला

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २१ :

जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आणि मातब्बर नेत्यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या गडचिरोली, आरमोरी व देसाईगंज या तिन्ही नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व राखले आहे. महायुतीमधील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) स्वतंत्र आव्हानाला आणि काँग्रेसच्या विरोधाला धोबीपछाड देत भाजपने या तिन्ही सत्ताकेंद्रांवरील आपला झेंडा कायम राखला.

जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या गडचिरोली नगरपालिकेत भाजपने ॲड. प्रणोती निंबोरकर या तरुण आणि सुशिक्षित चेहऱ्याला संधी दिली होती. नवख्या असूनही निंबोरकर यांनी मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली. त्यांना ११,७६२ मते मिळाली. येथे दुसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत राष्ट्रवादीच्या (अजित पवार गट) अश्विनी नैताम यांनी काँग्रेसच्या कविता पोरेड्डीवार यांना पिछाडीवर टाकत द्वितीय स्थान पटकावले. आमदार डॉ. मिलिंद नरोटे, माजी आमदार व खासदारांनी येथे पूर्ण ताकद पणाला लावली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा आणि भाजपच्या सत्तेचा प्रभाव निंबोरकर यांच्या विजयासाठी



निर्णायक ठरला. आरमोरी नगरपालिकेत भाजपने रुपेश पुणेकर यांच्या रूपाने कोरी पाटी असलेल्या उमेदवाराला मैदानात उतरवले होते. येथील सत्ता टिकवण्यासाठी ज्येष्ठ सहकार नेते अरविंद पोरेड्डीवार व प्रकाश पोरेड्डीवार यांनी प्रतिष्ठा पणाला लावली होती. निवडणुकीच्या ऐन तोंडावर राष्ट्रवादीने काँग्रेसला खिंडार पाडल्याने येथे तिरंगी लढत झाली. याचा फायदा घेत पुणेकर यांनी ५,५२८ मते मिळवून राष्ट्रवादीच्या जयकुमार मेश्राम यांना पराभूत केले.

## अकोला जिल्ह्यात चार नगरपरिषदेवर भाजपा

■ महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २१ :

जिल्ह्यातील तेल्हारा, आकोट, हिवरखेड व मुर्तीजापुर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी भाजपाच्या उमेदवाराने दणदणीत विजय मिळवला असून बाशीर्टाकळी नगरपंचायतमध्ये वंचित आघाडीच्या उमेदवाराच्या गळ्यात नगराध्यक्षपदाची माळ पडली तर बाळापुर नगरपरिषदेमध्ये काँग्रेसने आपला गड कायम ठेवला. पाच नगरपरिषद व एका नगरपंचायत करिता रविवार, २१ रोजी मतमोजणी पार पडली.या निवडणूकीत सहा नगराध्यक्ष पदासाठी ३८ तर १४२ नगरसेवकांच्या जागेसाठी ६७५ उमेदवार रिंगणात होते. निकालात भाजपाची सरशी पाहायला मिळाली असून तेल्हारा, अकोट मुर्तीजापुर हे आपले गड भाजपने कायम ठेवले असून नव्याने निर्माण झालेल्या हिवरखेड नगरपरिषदेवर देखील भाजपची सत्ता आली. या ठिकाणी मुख्यमंत्र्यांची झालेली सभा यशस्वी झाल्याचे या ऐतिहासिक विजयातून स्पष्ट होते. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत तेल्हारा-वैशाली पालिवाल (भाजपा), आकोट-माया धुळे (भाजप), हिवरखेड -सुलभा दुतोंडे (भाजपा), मूर्तिजापूर- हर्षल साबळे (भाजप), बार्शीटाकळी-अख्तरा खातून अलीमोद्दीन- (वंचित आघाडी), बाळापूर-डॉ अफरिन परवीन (काँग्रेस) यांचा विजय झाला.

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या पवनी नगरपरिषद निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. त्यात नगराध्यक्षपदाच्या अत्यंत चुरशीच्या लढतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) डॉक्टर विजया नंदुरकर यांनी विजय संपादन केला आहे.

# हे असे का झाले तर, 'देवेंद्र', 'रवींद्र' हेच उत्तर..!

संदीप काळे
मुख्य समूह संपादक
महासागर मीडिया ग्रुप

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर आज भारतीय जनता पक्षाने पुन्हा एकदा नवा इतिहास लिहिला आहे. या इतिहासाचे खऱ्या अर्थाने 'चाणक्य' ठरले आहेत ते म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस! भाजपने अत्यंत शिस्तबद्ध आणि 'संघ' शैलीने केलेल्या निवडणुकीच्या सूक्ष्म नियोजनाचा निकाल पुन्हा एकदा सकारात्मक लागला आहे. या विजयात पडद्यामागील महत्त्वाची धुरा सांभाळली ती रवींद्र चव्हाण यांनी. अनेक वेळा मंत्रिपद भूषवलेल्या चव्हाण यांच्याकडे भाजपने संघटनात्मक बांधणीची जबाबदारी मुद्दाम दिली होती; त्यामागे त्यांचा दांडगा अनुभव, मुरब्बी राजकारण आणि पक्षाचा 'मराठा चेहरा' ही प्रमुख कारणे होती.

युतीच्या अंतर्गत राजकारणाचा विचार केला तर, पहिल्यांदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनाही राजकीयदृष्ट्या सामावून घेताना, पक्षातील इतरांवर स्वतःचे वर्चस्व कायम राखण्याचे वातावरण युती झाल्यापासूनच दिसत आहे. देवेंद्र फडणवीस यांचा 'ब्राह्मण' चेहरा असल्याने, युतीमध्ये शह-काटशहाचे राजकारण शिजत असताना त्याला तोड देण्यासाठी भाजपच्या दिल्लीतील हायकमांडने रवींद्र चव्हाण या अनुभवी मराठा चेहऱ्याला संघटनात्मक बांधणीसाठी मैदानात उतरवले. सध्याच्या राजकीय वतुर्ळात देवेंद्र फडणवीस हे भविष्यात पंतप्रधान होतील, असे भाकीत वर्तवले जात आहे आणि त्यामागे ठोस कारणेही आहेत. त्याचप्रमाणे, या निवडणुकीतील यशामुळे महाराष्ट्रात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे भावी मुख्यमंत्री होऊ शकतात, या चर्चेलाही आता पोषक वातावरण मिळाले आहे. भविष्यात कोण कोणत्या पदावर जाईल हे निश्चित नसले तरी, आज या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपने घेतलेली मोठी झेप हा एक इतिहास ठरला आहे.

सध्या भाजपमध्ये दोन प्रकारचे प्रवाह पाहायला मिळतात. एकीकडे विजयाचा उन्माद आणि 'आमची सत्ता पुढील अनेक वर्षे राहील' अशा प्रकारचा आत्मविश्वास आहे, तर दुसरीकडे 'इतर पक्षांतून येऊन आम्हालाच शहाणपण शिकवणाऱ्या नेत्यांचे करायचे काय?' हा अंतर्गत प्रश्नही कायम आहे. चंद्रपुरातील अपयशानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी ज्या पद्धतीने विधाने केली, तशीच काहीशी स्थिती महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आहे. या विसंगतीवर ना भाजप तोडगा काढू शकते, ना युतीचा अन्य कोणताही नेता.तरीही, आजच्या यशाचे श्रेय भाजपच्या नियोजनालाच जाते.

कोणाच्याही भरोशावर न राहता, प्रत्येक गोष्ट चोख पार पाडण्याचे जे सामर्थ्य भाजपने दाखवले आहे, तशी पद्धत यापूर्वी कोणीही वापरली नव्हती. विजयानंतर विरोधकांनी, संजय राऊत यांच्यापासून ते सर्वच नेत्यांनी, नेहमीप्रमाणे 'पैशाचा पाऊस', 'फोडाफोडी' किंवा 'बिहारसारखे वातावरण' अशी टीका करण्याची एकही संधी सोडली नाही. परंतु, शांत डोक्याने विचार केला तर हे लक्षात येते की, हा विजय केवळ टीका करून पुसता येण्यासारखा नाही; हा विजय भाजपने त्यांच्या तळागाळातील कामातून खेचून आणला आहे. मुनगंटीवार यांच्या नाराजीमागे वेगळी राजकीय कारणे असू शकतात, मात्र चंद्रकांत पाटील यांच्यापासून ते बावनकुळे यांच्यापर्यंत भाजपच्या मूळ 'संघमय' कार्यकर्त्यांमध्ये जी नियोजनात्मक आणि रचनात्मक शिस्त आहे, तीच या विजयाचा मुख्य आधार ठरली आहे.

दुसरीकडे काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) या महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये कशाचाही ताळमेळ नसल्याचे दिसून येते. आगामी काळात भाजपमधील 'इनकमिंग' इतकी वाढेल की, कदाचित पक्षालाच आता 'बस झाले' असे म्हणावे लागेल. या विजयाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही गटांना आता जे सुरू आहे ते सुरळीत चालू देण्यासाठी भाजपसोबत संयमाने प्रवास करावा लागेल. विरोधी पक्षातील नेत्यांनी 'हा विजय भाजपच्या पारड्यात का गेला?' याचा सखोल विचार करणे गरजेचे आहे. भविष्यातील प्रत्येक निवडणुकीत भाजपचीच सरशी का दिसते, तर त्याचे कारण त्यांचे 'मायक्रो प्लॅनिंग', कार्यकर्त्यांवर टाकलेला विश्वास आणि जातीयतेला बाजूला सारून दिलेला पूर्ण वेळ हे आहे.

एकेकाळी 'उच्चवर्णीयांचा पक्ष' म्हणून हिणवल्या गेलेल्या भाजपने गेल्या काही वर्षांत आपण 'बहुजनांचा पक्ष' आहोत, हे या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा सिद्ध केले आहे. केवळ एकाच जातीचे राजकारण करून कोणाचेही आणि पक्षाचेही भले होऊ शकत नाही, हे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना कृतीतून दाखवून दिले आणि भाजपवर 'बहुजनांचा पक्ष' म्हणून शिक्कामोर्तब झाले. सामाजिक समरसतेसोबतच सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देणारी 'पंचसूत्री' हाती घेऊन भाजपने जी आगेकूच केली आहे, त्यावर सर्वांनीच विचार करण्याची गरज आहे. हा विजय नक्की कोणाचा, देवेंद्रचा की रवींद्रचा, हा चर्चेचा विषय असू शकतो, परंतु या विजयाचा खरा नायक तो शेवटचा कार्यकर्ता आहे, ज्याला पक्षाने मानसिक आणि आर्थिक बळ दिले आणि त्याला 'निष्ठेची' जोड दिली.

## अमरावतीत भाजपाचे ६ नगराध्यक्ष विजयी

■ महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. २१ :

अमरावती जिल्ह्यामध्ये १० नगरपरिषद व दोन नगरपंचायत निवडणुकीचे निकाल हाती आले आहे. नगराध्यक्षाच्या निवडणुकीत भाजपाचे सहा उमेदवार तर काँग्रेसचे दोन, दोन्ही शिवसेना, प्रहार, वंचित यांचा प्रत्येकी १ उमेदवार विजयी झाला आहे. अचलपूर नगर परिषदेमध्ये भाजपाच्या रूपाली माथने, अंजनगाव सुर्जी नगर परिषदेमध्ये भाजपाचे अविनाश गायगोले, धरणी नगरपंचायत मध्ये भाजपाचे सुनील चौथमल, धामणगाव नगर परिषदेमध्ये भाजपाच्या अर्चना रोठे - अडसड, वरुड नगर परिषदेमध्ये भाजपाचे ईश्वर सलामे, शेंदुरजना घाट नगर परिषदेमध्ये भाजपाच्या सुवर्णा वरखडे विजय झाल्या आहे. दयार्पूर नगर परिषदेमध्ये काँग्रेसच्या मंदाकिनी भारसाकळे, चिखलदरा नगर परिषदेमध्ये काँग्रेसचे शेख अब्दुल, चांदुर रेल्वे नगरपरिषद मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या प्रियंका विश्वकर्मा, चांदूरबाजार नगरपरिषद मध्ये प्रहारच्या मनीषा नांगलिया, मोर्शी नगर परिषदेमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या प्रतीक्षा गुल्हाने, नांदगाव खंडेश्वर नगरपंचायत मध्ये शिवसेना उबाठाच्या प्राप्ती मारोडकर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून विजयी झाले आहे.

## बुलढाणा नगराध्यक्षपदी शिवसेना (शिंदे) पूजा गायकवाड

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २१ :

अंत्यत चुरशीच्या नगर पालिका नगराध्यक्ष पदाच्या व नगरसेवकांच्या निवडणूकीचा निकाल दि. २१ डिसेंबर रोजी बुलढाणा नपा सभागृहात मतमोजणीनंतर दुपारी १ वाजता घोषित करण्यात आला. नगराध्यक्षपदी शिवसेना (शिंदे) पुजा संजय गायकवाड यांना १८५२५ मते मिळाली तर काँग्रेसच्या लक्ष्मी दत्ता काकस यांना १३७४५ मते मिळाली. तसेच भाजपच्या अर्पिता विजयराज शिंदे यांना ४१४९ मते मिळाली. पूजा गायकवाड यांचा ४७८० मतांनी विजय झाला.

निकाल घोषित होताच ढोलताशे डिजे, गुलाल पक्षाचे झेंडे विजयी रथावर फटाक्याच्या आतिषबाजीत जंगी मिरवणूक बाजार लाईल, कारंजा चौक, स्टेट बँक चौक, संगम चौक मार्गे काढण्यात आली.

या मिरवणूकीत रथावर नगराध्यक्ष पूजा गायकवाड, आ. संजय गायकवाड, विजय अंभोरे निवडूण आलेले नगरसेवक, नगरसेविका युवा सेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक मृत्यूंजय गायकवाड सहभागी झाले होते. भाजपला दोन काँग्रेस दोन, राष्ट्रवादी शपा दोन, अपक्ष दोन, नगरसेवकावर समाधान मानावे लागले.

# यवतमाळसह वणी, पांढरकवडा नगर परिषदेवर भाजपाचा झेंडा

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २१ :

यवतमाळ नगर परिषदसह वणी, पांढरकवडा नगर परिषदेवर भाजपाची सत्ता आली असून, यवतमाळ नगर परिषदेत भाजपाच्या अध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके, पांढरकवडा अतिष बोरले, वणी विद्या आत्राम यांचा विजय झाला आहे. पुन्हा एकदा यवतमाळ नगर परिषदेवर भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आहे. मतदान मोजणीदरम्यान काँग्रेसच्या नगर परिषद अध्यक्षपदाच्या उमेदवार प्रियंका मोघे यांनी आघाडी घेतली होती. मात्र, त्यानंतर ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी आघाडी घेत आपला विजय निश्चित केला. तर यवतमाळ नगर परिषदेत वंचितसह बसपा व अपक्षांनीसुद्धा आपले खाते उघडले.

यवतमाळ नगर परिषद अध्यक्ष आणि ५८ नगरसेवक पदासाठी निवडणूक झाली. यात प्रभाग क्रमांक १ मध्ये भाजपाचे श्रीकृष्ण कांबळे, काँग्रेसच्या वनिता बडे विजयी झाल्या. प्रभाग २ मध्ये काँग्रेसच्या सविता चव्हाण, वंचित आनंद गायकवाड, प्रभाग ३ मध्ये भाजपाच्या मीना मसराम, भाजपाच्या अश्विन बोपचे विजयी झाल्या.

प्रभाग ४ भाजपाच्या साधना काळे, शिंदे शिवसेना पिंटू बांगर विजयी झाले आहेत. प्रभाग ५ मध्ये शिवसेनेचा आकाश परतेकी, शिवसेनेच्या शोभा साबळे, प्रभाग ६ मध्ये काँग्रेसच्या वैशाली सवाई, काँग्रेसच्या विशाल पावडे, प्रभाग ७ मध्ये काँग्रेसच्या करुणा तेलंग, भाजपाच्या श्रद्धा भडके, प्रभाग ८ मध्ये भाजपाच्या लता ठोंबरे, भाजपा किरण प्रजापती, प्रभाग ९ शिवसेना चैताली बेलोकार, शिवसेना पूजा गायकी, प्रभाग १० वंचित मिरा वीर, वंचित नीरज वाघमारे, प्रभाग ११ भाजपा स्वाती खंडारे, भाजपा देविदास अराठे, प्रभाग १२ भाजपा विजय राय, भाजपाच्या मनीषा भावे, प्रभाग १३ भाजपा सुभाष राय, भाजपा शोभा हर्षे, प्रभाग १४ काँग्रेस साधना शंभरकर, काँग्रेसच्या सपना लंगोटे, प्रभाग २६ भाजपाचे दिलीप काळे, भाजपाच्या कीर्ती राऊत, प्रभाग २७ भाजपाच्या रिता धावतोडे, भाजपा पंकज देशमुख, प्रभाग २८ भाजपा अर्चना चिंडाले.